सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. १६ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०४ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शुभांशु शुक्ला पृथ्वीवर सुखरूप परतले

लॉस एंजेलस, १५ जुलै (हिं.स.)। भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांच्या तीन सहकाऱ्यांना घेऊन गेलेले स्पेसएक्सचे ड्रॅगन यान आज दुपारी ३:०१ वाजता (खडढ) पॅसिफिक महासागरात यशस्वीरित्या उतरले. ॲक्सिओम-४ (-- ४) या खाजगी अंतराळ मोहिमेचा हा शेवटचा टप्पा होता. ही १८ दिवसांची मोहीम आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) यशस्वीरित्या पार पडली.



शुभांशु शुक्ला हे आयएसएस वर पोहोचणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले असून, भारताच्या अंतराळ क्षेत्रासाठी हा एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. पुनःप्रवेशानंतर शुक्ला यांना यानातून बाहेर पडताना हसत, हात हलवत ग्राउंड टीमचे स्वागत करताना पाहण्यात आले. गुरुत्वाकर्षणाशी पुन्हा जुळवून घेताना त्यांना उभे राहण्यासाठी थोडा आधार घ्यावा लागला. क्सियम मिशन-४ मोहिमेदरम्यान शुक्ला आणि त्यांच्या टीमने आयएसएस वर ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोग केले. कृषी, औषधनिर्माण, पाणी व्यवस्थापन आणि मानवी शरीरशास्त्र या विषयांवरील हे प्रयोग सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात पार पडले. ही मोहीम सोमवार संध्याकाळी ४:५० वाजता खडड वरून सुटली होती आणि यान पृथ्वीवर परतण्यासाठी सुमारे २२.५ तास लागले.या मोहिमेचे नेतृत्व नासा च्या माजी वरिष्ठ अंतराळवीर आणि सध्या ॲक्सिओमसोबत कार्यरत असलेल्या पेगी व्हिट्सन यांनी केले, तर ड्रॅगन यानाचे पायलटिंग शुभांशु शुक्ला यांनी केले.ही मोहीम २०२७ मध्ये भारताच्या स्वतंत्र मानवी अंतराळ मोहिमेच्या - गगनयान - तयारीच्या पार्श्वभूमीवर, क्सियम मिशन-४ मध्ये भारतीय अंतराळवीराचा सहभाग ही अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जात आहे.

या मोहिमेत शुभांशु शुक्लांसोबत पोलंडचे स्लावोश उझ्नान्स्की-विहस्निएव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापु हे अंतराळवीरही सहभागी होते. यामुळे हा एक जागतिक सहकार्याचा आणि विज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणाचा उत्तम नमुना ठरला.स्पेसएक्स आणि ॲक्सिओम यांच्या सहकार्याने ही चौथी खाजगी अंतराळवीर मोहीम यशस्वीरित्या पूर्ण झाली असून, २०२० नंतरची ही स्पेसएक्सची १८वी मानवी मोहिम आहे.

## बिहारच्या मतदार यादीतून सुमारे ३० लाख नावे वगळणार

पाटणा, १५ जुलै : बिहारमध्ये मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. नवीन यादीत सुमारे २९ लाख ८६ हजार २३७ जणांची नावे मतदार यादीतून वगळली जाणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

निवडणूक आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, राज्यातील ७ कोटी ८९ लाख ६९ हजार ८४४ मतदारांपैकी आतापर्यंत ६ कोटी ६० लाख ६७ हजार २०८ लोकांनी आपले फॉर्म भरले आहेत. हे एकूण मतदारांच्या ८८.१८ टक्के आहे. म्हणजेच फक्त ११.८२ टक्के मतदारांना फॉर्म भरायचा आहे. आयोगाने सांगितले की, बीएलओने घरोघरी जाऊन दोनदा सर्वेक्षण केले. त्यात १.५९ टक्के म्हणजेच १० लाख ५० हजार ४६८ मतदारांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले.

तसेच २.२ टक्के म्हणजेच सुमारे १४ लाख ५३ हजार ४७८ लोक बीएलओला सापडले नाहीत. ते कायमचे दुसऱ्या ठिकाणी गेले आहेत असे सांगण्यात आले. याशिवाय, दोन ठिकाणी ०.७३ टक्के म्हणजेच ४ लाख ८२ हजार २९० लोकांची नावे नोंदणीकृत आढळली. जर आपण या तीन श्रेणी एकत्रितपणे पाहिल्या तर एकूण २९ लाख ८६ हजार २३७ लोक मतदार यादीतून वगळले जातील. राज्यातील कोणताही पात्र मतदार वगळला जाऊ नये यासाठी आयोग प्रयत्न करत आहे. बिहारमधून बाहेर पडलेल्यांना वृत्तपत्रे, सोशल मीडिया, कॉल आणि थेट संभाषणाद्वारे माहिती दिली जात आहे. ही यादी १ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाच्या मते, फॉर्म भरण्याचे काम वेगाने सुरू आहे. सुमारे १ लाख बीएलओ या कामात गुंतले आहेत. त्यांना आता तिसऱ्या टप्प्याचे सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे. याशिवाय, १.५ लाख बीएलए देखील क्षेत्रात आहेत, ज्यांना सर्व पक्षांनी नियुक्त केले आहे.

हे बीएलए दररोज ५० पर्यंत फॉर्म पडताळून सादर करू शकतात. राज्यातील सर्व २६१ महानगरपालिका संस्थांच्या ५६८३ वॉर्डांमध्ये विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत, जेणेकरून कोणताही पात्र शहरी मतदार वगळला जाऊ नये.

निवडणूक आयोगाने लोकांना ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करून दिली आहे.

## राहुल गांधींचे आत्मसमर्पण, जामीन मंजूर

### भारतीय सैन्याबाबत अपमानास्पद टिप्पणीचे प्रकरण

लखनऊ , १५ जुलै : ।काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष तथा विधानसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय लष्करासंदर्भात केलेल्या अपमानास्पद टिप्पणी प्रकरणात, लखनौच्या एमपी-एमएलए न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील गेल्या पाच सुनावणींमध्ये अनुपस्थित राहिल्यानंतर राहुल गांधी यांनी स्वतः अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी आलोक वर्मा यांच्यासमोर हजेरी लावली आणि जामीन मिळविण्यासाठी आत्मसमर्पण केले.

मिळालेल्या माहितीनुसार, भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या एका विधानासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या या प्रकरणात, राहुल गांधी पहिल्या पाच सुनावण्यां दरम्यान न्यायालयात हजर नव्हते. मात्र, मंगळवारी (दि.१५) ॲडिशनल चीफ ज्यूडिशियल मॅजिस्ट्रेट आलोक वर्मा यांच्या समोर स्वतः हजर होत त्यांनी सरेंडर केले आणि जामीन अर्ज दाखल केला. खरे तर, मे महिन्यात आलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर, ते आज(दि.१५) हजर झाले आहेत. राहुल गांधी यांनी संबंधित याचितेत, मानहानी प्रकरण आणि लखनौ एमपी-एमएलए न्यायालयाने फेब्रुवारी २०२५ मध्ये जारी केलेल्या समन आदेशाला आव्हान दिले होते. राहुल गांधी यांची याचिका फेटाळून लावताना, अलाहाबाद उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये भारतीय सैन्याची बदनामी करणारी विधाने करण्याचे स्वातंत्र्य समाविष्ट नाही.

दरम्यान, सीमा रस्ते संघटनेचे निवृत्त संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी, संबंधित न्यायालयात राहुल गांधींविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली आहे. यात म्हणण्यात आलो होते की, १६ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी भारतीय सैनिकांचा अपमान केला होता. ९ डिसेंबर २०२२ रोजी, माध्यमांना आणि लोकांना संबोधित करताना ते म्हणाले होते की, त्यांनी अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर भारतीय सैन्य आणि चिनी सैन्यातील चकमकीचा उल्लेख करत, लोक भारत जोडो यात्रेसंदर्भात विचारतील, पण चिनी सैनिकांनी आपल्या सैनिकांना केलेल्या मारहाणीसंदर्भात एकदाही प्रश्न विचारणार नाहीत.तक्रारदाराने आरोप केला आहे की, चिनी सैनिकांनी भारतीय सैनिकांना मारहाण केल्याच्या राहुल गांधी यांच्या कथित विधानामुळे आपल्या भावना दुखावल्या आहेत. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या विधानानंतर, भारतीय लष्कराने देखील एक अधिकृत निवेदन जारी केले होते. यात लष्कराने म्हटले होते की, चिनी सैन्य भारतीय हद्दीत अतिक्रमण करत होते. याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले. त्यानंतर चिनी सैन्य माघारी फिरले.

## गेल्या ११ वर्षात किरकोळ महागाईत ३ टक्क्यांची घट

नवी दिल्ली, १५ जुलै : युपीएच्या तुलतेने भाजप सरकारच्या शासन काळात गेल्या ११ वर्षात किरकोळ महागाई दरात सरासरी ३ टक्क्यांची घट झाली. युपीएच्या कार्यकाळात महागाई दर ८.१ टक्के होता. तर भाजपच्या कार्यकाळात ५.१ नोंदवल्या गेला. जून २०२५ मध्ये किरकोळ महागाई २.१ टक्क्यांवर आली आहे.

यूपीएच्या कार्यकाळात, जानेवारी २०१२ ते एप्रिल २०१४ या २८ महिन्यांपैकी २२ महिन्यांत महागाई दर ९ टक्क्यांहून अधिक होताअधिकृत आकडेवारीनुसार, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएच्या कार्यकाळात, जानेवारी २०१२ ते एप्रिल २०१४ या २८ महिन्यांपैकी २२ महिन्यांत महागाई दर ९ टक्क्यांहून अधिक होता. यूपीएच्या कार्यकाळातील शेवटच्या तीन वर्षांत, देशातील किरकोळ महागाई दर सरासरी ९.८ टक्के होता, तर त्यावेळी जागतिक महागाई ४-५ टक्क्यांच्या दरम्यान होती.



देशात जून २०२५ मध्ये किरकोळ महागाई २.१ टक्क्यांवर आली आहे त्याच वेळी, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, किरकोळ महागाई दर बहुतेक वेळा ५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला आहे आणि महागाई कधीही ८ टक्क्यांच्या पातळी ओलांडली नाही. जून २०२५ मध्ये किरकोळ महागाई २.१ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. मागील महिन्याच्या तुलनेत त्यात ०.७२ टक्क्यांची घट झाली आहे. मे महिन्यात ती २.८२ टक्के होती. आकडेवारीनुसार, गेल्या महिन्यात ग्रामीण पातळीवर किरकोळ महागाई दर १.७२ टक्के होता, तर शहरी पातळीवर किरकोळ महागाई दर २.५६ टक्के होता.

जून २०२५ मध्ये नोंदवलेला किरकोळ महागाई दर जानेवारी २०१९ नंतर किरकोळ महागाईचा सर्वात कमी आकडा आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या महिन्यात ग्रामीण पातळीवर किरकोळ महागाई दर १.७२ टक्के होता, तर शहरी पातळीवर किरकोळ महागाई दर २.५६ टक्के होता.

आरबीआयने २०२५-२६ साठीचा महागाईचा अंदाज ४ टक्क्यांवरून ३.७ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.या महिन्यात महागाईत झालेली मोठी घट प्रामुख्याने भाज्या, डाळी, मांस आणि मसाल्यांच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे झाली. दरम्यान, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अलीकडेच सांगितले की, आरबीआयने २०२५-२६ साठीचा महागाईचा अंदाज ४ टक्क्यांवरून ३.७ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) महागाई दर आता ३.७ टक्के असा अंदाज आहे, ज्यामध्ये पहिल्या तिमाहीत २.९ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ३.४ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ३.९ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ४.४ टक्के चलनवाढीचा अंदाज आहे.

## छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊनच विकासकामे करा -विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

### प्राधिकरण क्षेत्रातील रस्ते सिमांकनाच्या अनुषंगाने आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१५ : छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊनच विकास कामे करावीत, जेणे करुन भविष्यात नागरिकांची फसवणूक होऊन आर्थिक नुकसान होणार नाही व भविष्यात होणारी सिमांकन रेषेतील अनधिकृत तसेच अतिक्रमित बांधकामे टाळता येतील, या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी तत्परतेने सिमांकन पूर्ण करुन याबाबतचा अहवाल विहित कालमर्यादेत सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज येथे दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयात छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील रस्ते सिमांकनाच्या अनुषंगाने सर्व प्रमुख यंत्रणांकडून दुरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त श्री.पापळकर यांनी आढावा घेतला. यावेळी बैठकीला सिडकोचे मुख्य प्रशासक जगदिश मिनीयार, सह आयुक्त देविदास टेकाळे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये, तहसीलदार सुनंदा पारवे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपरचनाकार कृष्णा जाधव, सिडकोचे प्रशासक बी.एम. गायकवाड उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले, इमारत रेषा व नियंत्रण रेषा याबाबत शासन नियमात नमूद केलेल्या अंतरानुसार सिमांकन करुन घेण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे. भूसंपादन झालेल्या शासकीय मालकीच्या रस्त्यांवरील तात्पुरती तसेच पक्की अतिक्रमणे नागरिकांनी स्वत:हून काढून घ्यावीत. सिमांकन पूर्ण करुन यंत्रणांनी याबाबतचा अहवाल विहित कालमर्यादेत सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

सिडको झालर क्षेत्रातील ना-नागरी विभाग, फेज-२ क्षेत्राच्या अनुषंगानेही आढावा

वाळुज प्रकल्पातील विकास केंद्र जमीन संपादन, वाळुज प्रकल्पात तसेच सिडको झालर क्षेत्रात पुरविण्यात येत असलेल्या नागरी सोईसुविधा, त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क व कार्यालयात मनुष्यबळ व नागरी सोयी सुविधांचे हस्तांतरण, जमा सेवा सुविधा विकास शुल्क व विकास शुल्क यांचे हस्तांतरण, मंजूर नामंजूर विकास परवानगीचा व मंजूर विकास योजना(खरेदी सुचना, फेरबदल, संपादित क्षेत्र, न्यायालयीन प्रकरणे, डीपी व ईपी नकाशे)संबधिचा अभिलेखाचे हस्तांतरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औद्योगिक क्षेत्रालगतचा ना- नागरी विभाग, फेज-२ मधील जमीनीमध्ये अनुज्ञेय वापर व विकास परवानगी, निविदा प्रक्रिया झालेले व त्याअनुशंगाने प्रगती प्रथावर असलेले बांधकाम प्रकल्प याबाबत आज विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी आढावा घेतला.

## युती बाबतचा निर्णय मी योग्य वेळ आल्यावर घेईन - राज ठाकरे

इगतपुरी, १५ जुलै : होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. युती बाबतचा निर्णय मी योग्य वेळ आल्यावर घेईन अशी भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी घेतली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने इगतपुरी येथे दि. १४ जुलै पासुन मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या उपस्थितीत तीन दिवसीय राज्यस्तरीय शिबीर सुरू आहे. या शिबीरात उध्दव ठाकरेंची शिवसेना व मनसे यांच्या युतीबद्दल राज ठाकरे काय भुमिका घेतात याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागुन राहीले होते. मात्र शिबीराच्या पहिल्याच दिवशी राज ठाकरे यांनी युती बद्दल बोलणे टाळले. युती बाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळी निर्णय जाहीर करू असे त्यांनी सुतोवाच केले. तर मंगळवार दि. १५ रोजी शिबीराच्या दुसऱ्या दिवशी राज ठाकरे यांनी सकाळच्या सत्रात पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले. शिबीराच्या दुसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात राज ठाकरे यांनी पदाधिकारी यांच्याशी साधलेल्या चर्चेत बोलतांना सांगितले की, उद्धव ठाकरे शिवसेना व मनसे युती बाबत माध्यमांशी कोणतीही चर्चा करू नये. या बाबत मी स्वता लवकरच निर्णय घेईन. मात्र तो पर्यंत या विषयी कोणीही विचारणा अथवा पुढाकार घेवुन स्टेटमेंट देऊ नये. आगामी येणाऱ्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसे पदाधिकारी यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात बुथ निहाय परिक्षण करून निवडणुकीच्या तयारीला लागावे. मतदार याद्या पडताळणी करुन नव्याने मतदार यादीत समाविष्ठ झालेले नावे व दुबार नावांची चाचपणी करावी. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व पदाधिकारी यांनी आगामी निवडणुकीच्या तयारीला लागा असा सल्ला दिला. त्यानंतर नेते व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून ३ वाजेच्या सुमारास राज ठाकरे व अमित ठाकरे मुंबईला रवाना झाले. मात्र मुंबईकडे जाण्यापूर्वी पत्रकारांनी राज ठाकरेंना युती बाबत पुन्हा विचारले असता मी २० जुलैनंतर नाशिकचा दौरा करणार आहे. त्यावेळी पाहू असे सांगितले. तर संध्याकाळच्या सत्रात नेते व पदाधिकारी यांना बाळा नांदगावकर मार्गदर्शन करणार आहेत. मंगळवारी होणाऱ्या चर्चासत्रात संदीप देशपांडे, अविनाश अभ्यंकर, प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष ड. रतनकमार इचम, सलीम मामा शेख, सुदाम कोंबडे, मनोज चव्हाण यांच्यासह राज्यातील मुख्य पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विकास सावंत यांचे निधन

सिंधुदुर्ग, १५ जुलै : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, सावंतवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विकास भालचंद्र सावंत यांनी आज(दि.१५) सकाळी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.ते ६२ वर्षाचे होते. माजी मंत्री भाईसाहेब सावंत यांचे ते सुपुत्र होते. सावंत यांच्या निधनाने सहकार व शिक्षणक्षेत्रातील अभ्यासू नेतृत्व हरपल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. सावंत यांच्यावर बुधवारी(दि.१६) माजगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



विकास सावंत हे गेले काही महिने आजारी होते. यातच त्यांना अर्धांगवायूचा धक्का बसला. तरीही त्यांनी आपले काम सुरूच ठेवले होते. काँग्रेससह इतर सर्व राजकीय सामाजिक क्षेत्रात ते कायम अग्रेसर असायचे. मात्र आज(दि.१५) सकाळी त्याची प्रकृती अचानक खालवली आणि निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, नात, नातू असा मोठा परिवार आहे. युवा नेते विक्रांत सावंत यांचे ते वडील होते. सावंत यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, पालकमंत्री नितेश राणे यांनी विकास सावंत यांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांनी शोक व्यक्त केला तसेच जिल्हयातील प्रश्नांची जाण असणारा नेता हरपल्याची भावना व्यक्त केली. सावंत यांचे पार्थिव बुधवारी (दि.१६) सकाळी राणी पार्वती देवी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. यानंतर माजगाव येथील त्यांच्या निवासस्थानी पार्थिव ठेवले जाणार आहे. दुपारी १२ वा. माजगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राजू मसूरकर यांनी दिली.

## जळगाव महामार्गावर पंधरा लाखांचा गुटखा जप्त

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १५ : छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरून गुटखा व तत्सम पदार्थाची तस्करी करणारी एमएच ४६ एएक्स ००५५ टोयाटो कंपनीची इनोव्हा कार फर्दापूर पोलिसांच्या पथकाने सोमवारी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास महामार्गावर नाकेबंदी दरम्यान पकडली.मात्र यादरम्यान चालक फरार झाला.यावेळी आरोपीच्या ताब्यातून तब्बल २ लाख १७ हजार ३६० रुपयांच्या गुटख्यासह १५ लाख रुपये किमतीची टोयाटो कंपनीची इनोव्हा कार असा एकूण १७ लाख १७ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून ताब्यात घेण्यात आला.



फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,जगदीश सोनवणे, भरत कोळी,आकाश गवळी व संतोष उबाळे यांच्या पथकाने महामार्गावरील सोयगाव फाट्यावर सोमवारी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास नाकाबंदी दरम्यान जळगाव कडून अजिंठ्याच्या दिशेने जाणाऱ्या क्षतिग्रस्त इनोवा चारचाकी वाहनातून जात असलेला प्रतिबंधित गुटखा पकडला.मात्र यादरम्यान,चालक पळून जाण्यात यशस्वी झाला.

इनोवा कारमधून प्रतिबंधित असलेला गोवा व सी-१ कंपनीची सुगंधित तंबाखू असा २ लाख १७ हजार ३६० रुपयांचा गुटखा व १५ लाख रुपये किमतीचे चारचाकी वाहन असा एकूण १७ लाख १७ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अन्न व सुरक्षा अधिकारी मोहम्मद फरीद अब्दुल रशीद सिद्दीकी यांच्या फिर्यादीवरून आरोपी अज्ञात चालकाविरोधात फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोऊनि.चंद्रशेखर पाटील करीत आहे.

## सरसंघचालक मोहन भागवत कर्तृत्ववान महिलांशी साधणार संवाद

सोलापूर, १५ जुलै : उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत गुरुवारी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात ‘उद्योगवर्धिनी परिवार उत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. यावेळी सरसंघचालक हे उद्योगवर्धिनी केंद्राला भेट देऊन कर्तृत्ववान महिलांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी दिली.

तब्बल २४ वर्षांपूर्वी रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक नानाजी देशमुख यांनी उद्योगवर्धिनी संस्थेचे नामकरण केले. यानंतर सोलापुरात तीन वर्षांनी उद्योगवर्धिनी संस्थेची स्थापना झाली. हजारो महिलांनी विविध संकटांवर मात करत अनेकांनी स्वाभिमानी आयुष्याचा प्रवास उद्योगवर्धिनी सोबत केला आहे. शेकडो महिलांना शिलाई, खाद्य पदार्थ, स्वयंपाक आदींच्या माध्यमातून रोजगार मिळवून देतानाच शेकडो उद्योजिका घडल्या आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कवी कालिदास,महर्षी वेदव्यास यांची जयंती व गुरूपौर्णिमा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
श्री.केशवराज विद्यालय,लातूर येथे 'अखिल भारतीय साहित्य परिषद ' पुरस्कृत ' साहित्य भारती ' शाखा लातूरतर्फे संस्कृत कवी कालिदास व महर्षी वेदव्यास यांची जयंती आणि गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त शिक्षक,विश्वस्त जनकल्याण शाळेचे उमेश सेलूकर उपस्थित होते.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ गझलकार,प्रसिद्ध साहित्यिक अजय पांडे व संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक रमेश स्वामी हे होते.याप्रसंगी साहित्य भारती जिल्हा कार्यकारणी अध्यक्ष सौ.शैलजा कारंडे,शहर अध्यक्ष डॉ.नयन भादुले-राजमाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमा पूजन व कवी कालिदास यांच्या ग्रंथ पूजनाने झाली. सौ.तोडकर यांनी पद्य सादर केले. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांचा सत्कार ग्रंथ व गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्य भारती शहर अध्यक्ष डॉ.नयन भादुले-राजमाने यांनी केले.डॉ.राजमाने यांनी लिहित्या हातांना बळ मिळावे व ऐकणारे कान तयार व्हावे,ज्यातून समृद्ध पिढी निर्माण होईल,असा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश व्यक्त केला.जिल्हा कार्यकारणी अध्यक्ष सौ.शैलजा कारंडे यांनी ' साहित्य भारती ' या संस्थेची सविस्तर माहिती दिली. तद्नंतर ज्येष्ठ लेखक,नाट्यकर्मी,दिग्दर्शक व अभिनेते सुरेश गीरसागर यांनी अजय पांडे अनुवादित मेघदूताच्या काही अंशाचे वाचन केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक रमेश स्वामी यांनी महर्षी वेदव्यास यांच्या जीवनाची व ग्रंथरचनेची अतिशय मौलिक माहिती सर्वांसमोर सांगितली.



### संक्षिप्त वृत्त...

## मौलाना आझाद मंडळाचे कर्ज मंजूर होऊनही वाटप होईना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
मौलाना अबूल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाकडे व्यवसाय व शैक्षणिक कर्जासाठी केलेले अर्ज मंजूर होऊन दहा महिने झाले तरी अद्यापही वाटप झाले नाही. निधीचे कारण पुढे करण्यात येते. याच्या निषेधार्थ महाराष्ट्र जनएकता संघटनेच्यावतीने शहरातील मशिदी व मशीद रस्त्यावर शुक्रवारी दुपारी २ वाजता भीक मागो आंदोलन करण्यात आले. अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या मौलाना अबूल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाकडे हजारो नागरिकांनी मागील एक वर्षापूर्वी कर्जासाठी अर्ज केले होते. ते आठ महिन्यांपूर्वीच मंजूर झाले आहेत. परंतु, अद्यापपर्यंत एकाही लाभार्थ्याला कर्जाचा लाभ मिळाला नाही. महामंडळाकडे निधीच शिल्लक नसल्याचे कारण मंडळाच्यावतीने देण्यात येत आहे. परंतु, मुंबई महामंडळात मात्र अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना तत्काळ कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात काही अधिकाऱ्यांचे हात काळे झाले आहेत. त्यांची चौकशी करावी, या मागणीसाठी येथील मशीद रस्त्यावर भीक मागो आंदोलन करण्यात आले. जमा झालेला निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात येणार आहे. निवेदनावर खाला शेख यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सीमेवरच्या जवानांसाठी लातूरकरांचा प्राणवायू : ऑक्सिजन प्लॅन्टचे राष्ट्रार्पण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
कोविड महामारीच्या काळात लातूरकरांच्या सहकार्यातून,नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने उभारण्यात आलेला स्पंदन ऑक्सिजन प्लॅन्ट जम्मू काश्मीर मधील अखनूर येथे उभारण्यात येत असलेल्या १०० खाटांच्या मिलिटरी रुग्णालयास हस्तांतरित करण्यात आला. जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यामुळे सीमेवरील जवानांना आता लातूरकरांचा प्राणवायूच जणू मिळणार आहे.

लातूरकरांच्या दातृत्वातून १ कोटी ५ लाख रुपये खर्च करून या प्लॅन्टटची उभारणी करण्यात आली होती. यासाठी पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे काका, लक्ष्मीरमण लाहोटी,ज्येष्ठ विधीज्ञ संजय पांडे,डॉ. अशोक आरदवाड,अतुल ठोंबरे,डॉ. अजय पुनपाळे,डॉ. कल्याण बरमदे, विवेकानंद वैद्यकीय प्रतिष्टान,बांधकाम व्यावसायिक, वकील,व्यापारी,पत्रकार बांधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहकार्य केले होते.प्रशासकीय पातळीवर तत्कालीन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी.जी. श्रीकांत,,मनपा आयुक्त अमन मित्तल यांनी ही मदत केली. कोविडची लाट ओसरल्यानंतर या प्लॅन्टची स्थानिक पातळीवर फारशी गरज नव्हती. त्यामुळे प्लॅन्ट राष्ट्राला अर्पण करण्यात आला. सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठी हा प्लॅन्ट महत्त्वाचा ठरणार आहे. यासाठी लष्करा कडून ब्रिगेडीयर कमांडर (१० डिव्हिजन आर्टिलरी ब्रिगेड) विनय शर्मा यांनी गेली २ महिने संपर्क साधून पत्र व्यवहार केला होता.

सोमवारी (दि. १४)जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे राष्ट्रार्पण संपन्न झाले. यावेळी लष्कराचे प्रतिनिधी सोमनाथ लाटकर, नरसिंह प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिरीष कुलकर्णी, सचिव संजय अयाचित, डॉ. विश्वास कुलकर्णी, डॉ. श्रीकांत हिरेमठ, सौ. गीता ठोंबरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हाधिकाऱ्यानी हिरवा झेंडा दाखवून हा ऑक्सिजन प्लॅन्ट राष्ट्राला समर्पित केला.

## सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात - भिक्खु पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
शील, सदाचार, शांती, करुणा, मैत्री आणि नीती हे नैतिकतेचे प्रमुख अंग आहेत. सदाचाराचा मार्ग हा चांगुलपणाचा मार्ग आहे. त्यामुळे सद्गुणरुपी सन्मार्गाने मनुष्य जातीने जाण्याचा सातत्याने प्रयत्न मनुष्य जातीने केला पाहिजे. यामुळेच सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.

आषाढ पौर्णिमेनिमित्त वर्षावास अधिष्ठान व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने महाविहार, धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भिक्खू संघ व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुष्पाने, धुपाने आणि दीपाने पूजा करून त्रिसरण पंचशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली.

# राडा प्रकरणी भाजप- कॉँग्रेस आमने सामने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
शहरातील मंठाळेनगर परिसरात काँग्रेसने आयोजित केलेल्या भूमिपूजन कार्यक्रमाचा लोकशाही मार्गाने निषेध करत असताना भाजप कार्यकर्ते सचिन उमेश जाधव यास काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी मारहाण केली, असा आरोप करत या प्रकरणी सचिन जाधव यांच्यावतीने गांधी चौक पोलीस ठाण्यात भाजप शिष्टमंडळाने फिर्याद दिली आहे. मारहाण करणाऱ्यांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दरम्यान काँग्रेसनेही पत्रकार परिषद घेवून आपली भूमीका मांडली आहे.

भाजपने दिलेले निवेदनात म्हटले आहे की, लातूर शहरातील मंठाळेनगर परिसरात रविवार सायंकाळी काँग्रेसच्यावतीने रस्ता भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास आमदार अमित देशमुख यांचीही उपस्थिती होती. या भूमिपूजन कार्यक्रमाच्या निषेधार्थ भाजपने लोकशाही पध्दतीनुसार आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान भाजप कार्यकर्ता सचिन जाधव यास काँग्रेस कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आली. तसेच काँग्रेस कार्यकर्त्यांनी सचिन जाधव यास जीवे मारण्याची धमकीही दिली आहे. या प्रकरणी कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या शिष्टंडळात सरचिटणीस ॲड. दिग्विजय काथवटे, ॲड. प्रदीप मोरे, प्रवीण सावंत, रवी सुडे, रागिणी यादव, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, गणेश गोमचाळे, ॲड. ललित तोष्णीवाल, सुरेश जाधव, राहुल भुतडा, विशाल हावा, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे, निर्मला कांबळे, श्रीकांत रांजणकर, ॲड. गणेश गोजमगुंडे, प्रमोद गुडे, संजय गीर, आबासाहेब चौगुले, मुन्ना हाश्मी, विनय जाकते, रविशंकर लवटे, सिमा करपे आदिंची उपस्थिती होती.

### .. ही तर भाजपची स्टंटबाजी : काँग्रेस

कामाची वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर त्या -त्या भागातील संबंधित लोकप्रतिनिधींना संबंधित ठिकाणी विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा अधिकार आहे. रविवारी शहराचे आमदार अमित देशमुख हे प्रभाग क्रमांक १८ मध्ये रस्ता कामाचे भूमिपूजन करण्यासाठी गेले असता, भाजपचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घालून लातूरच्या राजकीय इतिहासाला गालबोट लावले आहे. अजित पाटील कव्हेकर यांनी गेल्या पाच वर्षात नगरसेवक या नात्याने त्यांच्याच प्रभागातील, त्यांच्याच घरासमोरील रस्ता बनवता आला नाही. म्हणून स्वत:चे अपयश लपविण्यासाठी केलेली स्टंटबाजी आहे, असा आरोप शहर काँग्रेसच्यावतीने सोमवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार भवनात झालेल्या या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, ज्येष्ठ नेते अशोक गोविंदपूरकर, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ॲड. दीपक सूळ, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, मागासवर्गीय सेलचे प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## बियाणांच्या तक्रारीत निलंगा नंबर 'वन'वर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
गतवर्षीच्या अवकाळी पावसाचा परिणाम यंदाच्या खरिपावर जाणवत आहे. अवेळी झालेल्या पावसामुळे महाबीजच्या बियाणाला फटका बसला होता. त्यामुळेच यंदा महबीजच्या बियाणांबाबत तक्रारी वाढत आहेत.

जिल्ह्यातून १४१ तक्रारी या कृषी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या असून यामध्ये निलंग्यातून सर्वाधिक ९० तक्रारी आहेत. एकीकडे पावसाची उघडीप आणि दुसरीकडे बोगस बियाणे अशा दुहेरी संकटात सध्या जिल्ह्यातील शेतकरी आहेत. बियाणं म्हटलं की महाबीजचाच पर्याय शेतकऱ्यासमोर येतो. गेल्या अनेक वर्षापासूनच्या विश्वासाला तडा जावा अशीच स्थिती यंदा निर्माण झाली.

## ड्रग्ज खरेदी करणारे तिघे ताब्यात

### दोन आरोपी कोठडीत तर एकाचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
तीन दिवसांपूर्वी लातुरात जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जच्या १५७ पुड्या मुंबईहून आणल्या असून, यातील तीन पैकी दोन आरोपी मुंबई येथील आहेत. यातील दोघे कोठडीत, तर एकाचा शोध सुरू असून, तपास यंत्रणा ड्रग्ज प्रकरणातील गुन्हेगारांची पाळेमुळे खोदून काढत आहेत. पोलिसांनी ड्रग्ज खरेदी करणाऱ्या तीन ग्राहकांना ताब्यात घेतले असून, ड्रग्ज आम्ही स्वत:साठी सेवन करण्यासाठी घेतले असल्याचे या तिघांनी सांगितले आहे.

शिक्षणाची पंढरी असलेल्या लातूर जिल्ह्यात मागील तीन महिन्यांत तब्बल २ कोटी २ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. यातून लातूरला ड्रग्जचा विळखा पडलेला दिसून येत आहे. त्यातच ३ दिवसांपूर्वी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एलआयसी कॉलनीत छापा टाकून सुमारे ८ लाख रुपये किमतीचे एमडी (मॅफेड्रॉन) ड्रग्ज आणि एक पिस्तूल जप्त केली.

या प्रकरणी विवेकानंद चौक ठाण्यात आरोपी गणेश अर्जुन शेंडगे व रणजीत तुकाराम जाधव यांच्यासह मुंबईच्या अन्य एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गणेश अर्जुन शेंडगे व रणजीत तुकाराम जाधव यांना अटक केली असून, ते कोठडीत आहेत. तर फरार आरोपीचा शोध सुरू आहे. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी गणेश अर्जुन शेंडगे व रणजीत तुकाराम जाधव यांच्याकडून एमडी ड्रग्जचे सेवन करण्यासाठी विकत घेणारे अजय धनराज सूर्यवंशी (वय २१, रा. शिवपार्वतीनगर, कन्हेरी शिवार, लातूर), अजर सय्यद (वय २८, रा. रत्नापूर चौक, लातूर) आणि अर्जुन उर्फ गोट्या अच्युतराव कूपकर (वय ३०, रा. आर्वी, ता. लातूर) या तिघांना शनिवारी ताब्यात घेऊन चौकशी केली. हे तिघे गणेश शेंडगे याचे मित्र असून, त्यांनी गणेश शेंडगे यांच्याकडून स्वत:साठी सेवन करण्यासाठी ड्रग्ज घेतले असून, त्यांच्या जवळच्या मित्रांनाही सेवन करण्यासाठी गणेश हा ड्रग्ज उपलब्ध करून देत होता, असे सांगितले. हे तिघेही व्यसनाधीन व नशेबाज असल्याचे समोर आले आहे. पहिल्या टप्प्यात ड्रग्ज मुंबईतून आणले जात असल्याच्या शक्यतेला दुजोरा मिळाला आहे. मुंबईतील एक आरोपी पोलीस कोठडीत असून, जबाबात ड्रग्ज नेमके कोठून आणले, त्याचा पुरवठा कसा केला जातो याचे धागेदोरे पोलीस शोधून काढत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर तसेच विवेकानंद चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांची पथके आरोपींच्या मागावर आहेत.

## विहार हे अज्ञान, अंधश्रध्दा दूर करण्याचे, ज्ञानाचे व प्रगतीचे केंद्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
समाजात अज्ञान, अंधश्रध्दा आणि खुळ्या समजुती दूर करण्यासाठी विहार हे ज्ञानाचे, प्रगतीचे आणि उन्नतीचे केंद्र आहे. तसेच, सदाचार, विवेक, नीतिमूल्ये आणि व्यसनमुक्तीचे शिक्षण देणारे ठिकाण म्हणून विहाराचे महत्त्व अनमोल आहे, असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालयातील पाली भाषेचे प्रा. डॉ. भीमराव पाटील यांनी केले.

शहरातील बौध्दनगरातील वैशाली बुध्द विहार येथे आयोजित 'बुध्द धम्म वर्षावास सुसंस्कार पर्व' या बुध्द वंदनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. पाटील म्हणाले, बुध्द विहार हे राष्ट्रनिर्मितीचे आणि व्यक्तीचे मन, मनगट व मेंदू मजबूत करण्याचे केंद्र आहे. सध्याच्या शिक्षण पध्दतीत सक्षम शिक्षण मिळणे अवघड झाले असल्याने, विहारात एकत्र येऊन विज्ञानवादी व विवेकवादी पिढी घडविणे गरजेचे आहे. मुलांना दैववादी न बनविता प्रयत्नवादी बनविण्यास विहारातील आचरण महत्त्वाचे आहे. भगवान बुध्दांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि परिनिर्वाण वृक्षाखाली झाल्याने ते वृक्षप्रेमी होते. म्हणून प्रत्येकाने एक तरी वृक्ष लावावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी भगवान बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन, गुणवंतांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील करिअरच्या सुवर्णसंधी, मार्गदर्शन व विविध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा दयानंद सभागृह पार पडला.

अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हरिप्रसाद सोमाणी, सी.ए. पवन गहूकर, सी.ए. महेश दुबे, संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात प्रा. ऋतुजा देशमुख यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीबद्दल माहिती दिली. प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी वाणिज्य शाखेतील करिअरच्या सुवर्णसंधी व महाविद्यालयाची स्पष्ट केली. यावेळी डॉ. सोमाणी, दुबे, गहूकर यांनी विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला. अध्यक्षीय समारोपात बोरा यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योती कुलकर्णी व प्रा. सुवर्णा कारंजे यांनी केले. आभार डॉ. सुभाष मोरे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
शील, सदाचार, शांती, करुणा, मैत्री आणि नीती हे नैतिकतेचे प्रमुख अंग आहेत. सदाचाराचा मार्ग हा चांगुलपणाचा मार्ग आहे. त्यामुळे सद्गुणरुपी सन्मार्गाने मनुष्य जातीने जाण्याचा सातत्याने प्रयत्न मनुष्य जातीने केला पाहिजे. यामुळेच सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.

आषाढ पौर्णिमेनिमित्त वर्षावास अधिष्ठान व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने महाविहार, धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भिक्खू संघ व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुष्पाने, धुपाने आणि दीपाने पूजा करून त्रिसरण पंचशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्राप्त भुजंग कांबळे यांच्या समवेत नागोराव बोरीकर, मोहन शृंगारे, बसवंतप्पा उबाळे, डी.एस.नरसिंगे, संजय लातूरकर, अशोक कांबळे, डॉ. जितेंद्र वाघमारे, प्रा. यु. डी. गायकवाड, रवींद्र कांबळे, संजीवनी गडेराव या सर्वांचा जाहीर सत्कार समाज बांधवांच्यावतीने करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले की, तथागत भगवान बुद्ध हे जगातील मानव जातीचे पहिले कल्याण मित्र आहेत. तथागत बुद्धाची शिकवण ही मानव कल्याणाची असल्याने तथागत बुद्ध हे खऱ्या अर्थाने जगाचे जगद्गुरु आहेत. जगाला बुद्धाच्या शिकवणीची गरज कायम भासणार आहे आणि म्हणून सर्व मनुष्य जातीने बुद्धाच्या तत्त्वांचे आपल्या जीवनात पालन करून स्वकल्याण करून घ्यावे. बुद्ध होणं म्हणजे शब्दांना आचरणानं आणि विचाराने शुद्ध होण आहे. असेही आपल्या धम्मदेसनेत भंतेजी म्हणाले.

याप्रसंगी भंते बोधिराज यांचीही धम्मदेसना झाली. कार्यक्रमास पांडुरंग अंबुलगेकर, उत्तम कांबळे, इंजि. एम एन गायकवाड, ज्योतीराम लामतुरे, गणपतराव कदम, ये.पी. कांबळे, राहुल शाक्य मुनी, उदय सोनवणे, विलास अवशंख, करन ओव्हाळ, परमेश्वर आदमाने, कांताबाई सरोदे, शोभा सोनकांबळे, शकुंतला नेत्रगावकर, मिना कदम, निर्मला थोटे आदी उपस्थित होते.

## प्रामाणिकपणा; ९८ हजारांचा ऐवज रिक्षाचालकाने केला परत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
लातूरहून अहमदपूरला जाणाऱ्या एका महिलेची ऑटोरिक्षात ९८ हजार रुपयांचा ऐवज असलेली पर्स विसरली होती. तत्काळ त्यांनी विवेकानंद चौक पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी त्या रिक्षाचा शोध लावून चालकांशी संपर्क साधला. त्या रिक्षा चालकाने शनिवारी पोलीस ठाण्यात येऊन त्या महिलेस ऐवज असलेली पर्स सुपूर्द केली.

लातूरहून अहमदपूरला जाणाऱ्या ऑटोरिक्षामध्ये रमाबाई विश्वनाथ वाघमारे ह्या लातूरच्या स्वामी विवेकानंद चौक येथून बसल्या होत्या. अहमदपूर येथे रिक्षातून उतरल्यानंतर आपली पर्स ऑटोतच विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ विवेकानंद चौक पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली.

दरम्यान, पोलिसांनी रिक्षाचा माग काढत सीएनजी भरलेल्या पंपावरून रिक्षाचा क्रमांक आणि रिक्षाचालकाचा मोबाइल क्रमांक मिळवत त्याच्याशी संपर्क साधला असता, पर्स रिक्षामध्ये असल्याचे त्याने सांगितले. रिक्षाचालक महादेव गणपती कांबळे याने शनिवारी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात येऊन सदर पर्स रमाबाई वाघमारे यांना सुपूर्द केली.

यावेळी पोलीस निरीक्षक संतोष पाटील, सहायक पोलीस निरीक्षक रावसाहेब चव्हाण, पोलीस अंमलदार रवी कांबळे, संजय बेरळीकर, आनंद हल्लाळे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महापूजा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
आषाढी एकादशीनिमित्त स्मार्ट व्हिलेज सिकंदरपूर येथील विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही गावच्या प्रथम नागरिक आदर्श सरपंच रेश्मा माधवराव गंभीरे व माधवराव शामराव गंभीरे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.

यावेळी पूजेचे यजमान वर्षा दिलीप गंभीरे व दिलीप रामभाऊ गंभीरे होते. महापूजा पार पडल्यानंतर सरपंच रेश्मा गंभीरे यांनी विठ्ठलाकडे राज्यात भरपूर पाऊस पडू दे. राज्य सुजलाम सुफलाम होऊ दे. राज्य सरकारला शेतकऱ्याची कर्जमाफी करण्याची सद्बुद्धी दे, असे साकडे घातले. यावेळी मंदिरचे पुजारी संतोष घुग्गीकर तसेच वारकऱ्यांसह महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिक्षणाधिकारी शिंदे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ जुलै -**
जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारीपदी नागनाथ शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. याबद्दल येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, साईबाबा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन जे. जी. सगरे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे, गेवराई येथील ॲड. बाळासाहेब सानप, मुख्याध्यापक बी. यू. मिसाळ, जी. जे. पवार, शिवकांत स्वामी, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## संभाजीनगरसाठी लो-एमिशन झोन धोरणातून २३३ कोटींची संधी

छत्रपती संभाजीनगर, १४ जुलै २०२५: इंटरनॅशनल कौन्सिल ऑन क्लीन ट्रान्सपोर्टेशनच्या नव्या अभ्यासात स्पष्ट करण्यात आलं आहे की, जर छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) मध्ये नीट डिझाइन केलेला लो-एमिशन झोन तयार केला गेला, तर पर्यावरणीय आणि सार्वजनिक आरोग्यदृष्टीने सुमारे २३३ कोटींचा फायदा होऊ शकतो.या शहराला गेल्या अनेक वर्षांपासून वायूप्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. यासाठी येथे एक व्यापक स्वच्छ हवा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. आयसीसीटी ने अर्बन रिसर्च फाउंडेशन आणि इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट अँड डेव्हलपमेंट पॉलिसी यांच्या सहकार्याने एलईजेड चे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एलईजेड म्हणजे असे शहरी क्षेत्र जेथे सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर बंदी घालण्यात येते किंवा ते टप्प्याटप्प्याने वापराबाहेर काढले जातात. हे धोरण प्रामुख्याने जुन्या, जास्त उत्सर्जन करणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालते आणि शून्य-उत्सर्जन वाहतूक पर्यायांना चालना देते.

## नथिंग फोन(३) आणि नथिंग हेडफ़ोन (१) आता भारतात विक्रीसाठी उपलब्ध

मुंबई -नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीने आज त्यांची दोन उत्पादने भारतात खरेदीसाठी उपलब्ध होत असल्याची घोषणा केली. आपापल्या क्षेत्रात नवे मापदंड रचणारे नथिंग फोन (३) हा त्यांचा खऱ्या अर्थाने मुख्य स्मार्टफोन आणि नथिंग हेडफ़ोन (१) हे ओव्हर इअर ऑडिओ उत्पादनांमधील त्यांचे पहिले उत्पादन आज दुपारी १२ वाजल्यापासून भारतात उपलब्ध असणार आहेत. विचारपूर्वक डिझाइन आणि दमदार नाविन्यतेसह कन्झ्युमर टेकला नवे स्वरूप देण्याचा नथिंगचा दृष्टिकोन या नव्या उत्पादनांमधून प्रतित होत आहे. नथिंग फोन (३) मधील दमदार नाविन्यतांमुळे स्मार्टफोनच्या उद्योग जगतात नवे मापदंड रचले जातील. या फोनमध्ये प्रो-ग्रेड ट्रिपल कॅमेरा प्रणाली तसेच या क्षेत्रातील सर्वोत्तम म्हणजेच १/१.३ मुख्य सेन्सर असल्याने कमी प्रकाशातही उत्तम फोटो काढता येतात. शिवाय यात लॉसलेस ऑप्टिकल झुम आणि सर्व लेन्सेसमध्ये सिनेमॅटिक ४के ६० एफपीएस व्हिडीओ तसेच फूल ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशन आहे. अल्ट्रा नॅरो कडांसह दमदार ६.६७ एमोलेड डिस्प्ले आणि दमदार स्नैपड्रैगनएॅटी जनरेशन ४ चिपसेट अशा अनेक सुविधा या प्रीमिअम मॉड्युलर डिझाइनमध्ये एकत्रित करण्यात आल्या आहेत.

## प्रेस्टीज एडिशन ॲक्सेसरी पॅकेज सादर

बंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या लोकप्रिय हॅचबॅक टोयोटा ग्लांझा मध्ये दोन महत्त्वपूर्ण अपडेट जाहीर केले आहेत. यामागचा उद्देश म्हणजे वाहनाची सुरक्षितता अधिक वाढवणे आणि ग्राहकांना अधिक मूल्य देणे आहे.सुरक्षिततेबाबत आपली वचनबद्धता अधोरेखित करत, टोयोटा ग्लांझा च्या सर्व व्हेरिएंटमध्ये आता सहा एअरबॅग्स मानक (स्टँडर्ड) म्हणून दिल्या जातील, जे चालक आणि प्रवाशांसाठी अधिक सुरक्षितता देतील. त्याच्या प्रीमियम डिझाईन, प्रगत टेक्नॉलॉजी आणि विश्वासार्ह परफॉर्मन्समुळे ग्लांझा ही कार प्रथमच कार खरेदी करणाऱ्या ग्राहकांमध्ये, तरुण प्रोफेशनल्स आणि शहरी भागातील लोकांमध्ये खूपच लोकप्रिय ठरली आहे. स्टायलिश डिझाइन, इंधन कार्यक्षमता आणि त्रासमुक्त मालकीच्या अनुभवामुळे लोकप्रिय ठरलेली ही ग्लांझा, आता सहा एअरबॅग्ससह अधिक सुरक्षित आणि आकर्षक ठरणार आहे. यामुळे प्रत्येक ग्राहकाला अधिक आत्मविश्वास आणि मानसिक शांती मिळेल.

## वीवो एक्स फोल्ड५ भारतात लाँच झाला

नवी दिल्ली : जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने आज त्यांचा सर्वात प्रगत फोल्डेबल स्मार्टफोन - विवो एक्सफोल्ड५ लाँच केला. हे उपकरण म्हणजे प्रमुख कामगिरी, प्रीमियम कारागिरी आणि एआय-संचालित उत्पादकता यांचे मिश्रण आहे, जे फोल्डेबल स्मार्टफोन्सची पुनर्परिभाषा देते. फक्त २१७ ग्रॅम वजनाचा, एक्स फोल्ड५ पारंपारिक फ्लॅगशिप उपकरणांपेक्षा हलका आहे. ४५०० निट्सच्या कमाल ब्राइटनेससह, हा भारतातील फोल्डवरील सर्वात तेजस्वी डिस्प्ले आहे. हे टिकाऊ आणि कठोर परिस्थितींना तोंड देण्यासाठी बांधले आहे, ज्यामध्ये पाणी, धूळ आणि -२०ओसी पर्यंत तापमानापासूनआईपीएक्स८, आईपीएक्स९, आईपीएक्स९+ आणिआईपी५एक्स पातळीचे संरक्षण आहे. ६०००एमएएच बॅटरीद्वारे समर्थित - भारतातील कोणत्याही फोल्डवरील ही सर्वात मोठी बॅटरी आहे - आणि ८०डब्ल्यू ड्युअल-सेल वायर्ड फ्लॅशचार्ज आणि ४०डब्ल्यू वायरलेस फास्ट चार्जिंगसह, हे डिव्हाइस तुम्हाला सर्वात व्यस्त दिवसांमध्ये देखील चालू ठेवते. ०.४३ सेमी लांबीचा अल्ट्रा-स्लिम फोल्डेड प्रोफाइल आणि एरोस्पेस-ग्रेड मटेरियलमुळे ते गुळगुळीत आणि दीर्घकाळ टिकते.

## विवोने एक्स२००एफई लाँच केला

नवी दिल्ली : जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण ब्रँड असलेल्या विवोने त्यांचे नवीन एक्स सिरीज डिव्हाइस एक्स२०० एफई लाँच केले. हे अशा चित्रकारांसाठी डिझाइन केले आहे ज्यांना १६०० चा अनुभव एका उत्कृष्ट पद्धतीने अनुभवायचा आहे. एक्स२००एफई हे झीस च्या सहकार्याने विकसित केलेले एक शक्तिशाली पण शक्तिशाली उपकरण आहे जे प्रो-लेव्हल फोटोग्राफी क्षमता आणि दीर्घ बॅटरी लाइफसह आहे ज्यामध्ये ६५००एमएएचबॅटरी आणि ९०डब्ल्यू फ्लॅश चार्जर आहे.विवो इंडियाचे उत्पादन प्रमुख विकास तग्रा म्हणाले: एक्स२००एफई सह आम्ही एक असा कॅमेरा तयार केला आहे जो कॉम्पॅक्ट, सहज आणि वापरण्यास उत्तम आहे. हे विवो च्या सिग्नेचर इनोव्हेशन्सना जिवंत करते - हार्डकोर, प्रोफेशनल-ग्रेड झीस इमेजिंग तंत्रज्ञान आणि दैनंदिन जीवनात अखंडपणे बसणारी प्रीमियम डिझाइन.

# 'आयएमए' विरोधात 'हिम्पम्' ने उगारले आंदोलनास्त्र, होमिओपॅथिक विरुद्ध ॲलोपॅथिक डॉक्टरांचा वाद



छत्रपती संभाजीनगर - आधुनिक औषधशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करण्या-या होमिओपॅथिक इंटीग्रेटेड डॉक्टरांची मेडिकल कौन्सिलकडे नोंदणीला आठ वर्षांनी हिरवा कंदील मिळूनही त्यास आयएमए मुळे दोन महिने स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे इंडियन मेडिकल असोसिएशन विरोधात महाराष्ट्र होमिओपॅथिक कौंसिलचे प्रशासक डॉ. बाहुबली शाह आमरण उपोषणासाठी दि. १६ जुलै रोजी सकाळी आजाद मैदान मुंबई येथे बसणार आहेत .

त्यांच्या या निर्णायक लढ्याला पाठींबा दर्शनासाठी राज्यातील १५ ते २० हजार होमिओपॅथिक इंटीग्रेड डॉक्टर्स साखळी उपोषणास बसणार आहे आणि महाराष्ट्राच्या होमिओपॅथिक डॉक्र्सच्या न्यायहक्कासाठी राज्यातील सर्व होमिओपॅथिक डॉक्टर्स आपले दवाखाने बंद करुण सक्रिय पाठींब्यासाठी मुंबई येथील उपस्थित राहतील तसेच आपल्या न्याय हक्कासाठी संघटीत व्हावे असे आव्हाल हिम्पाम् मराठवाडा चेअरमेन डॉ. प्रकाश झांबड केले आहे.

राज्यातील सर्व होमिओपॅथिक डॉक्टर ग्रामीण भागातील व शहरी भागातील सर्व सामान्य रुग्णांची सेवा करीत असताना तसेच शासनाने त्यांना अधिकृत मान्यता दिलेली असतानाही या डॉक्टरांची एम.एम.सी. मध्ये नोदणी करण्यास आय.एम.ए. बेकायदेशीय विरोध करत असून समाजाची दिशाभूल थांबावावी असे आवाहन होमिओपॅथिक इंटीग्रेटेड मेडिकल असोसिएशनचे चेअरमेन डॉ. प्रकाश झांबड यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रारूप प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.१५ जुलै - आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने कन्नड तालुक्यातील आठ गट आणि १६ गणासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशाने १४ जुलै २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदर गट आणि गण रचना २०११ च्या लोकसंखेच्या अनुषंगाने गृहीत धरून तयार करण्यात आली आहे. त्यामुळे २०१७ प्रमाणेच जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण राहणार आहेत. परंतु काही वेगवेगळ्या गटात व गणात गेल्याने या गावांच्या विकास कामावर भौगोलिक परिस्थितीमुळे परिणाम होणार आहे. यामध्ये पिशोर गटातील पळशी खुर्द व पळशी बुद्रूक गावे चिकलठाण गटात गेले आहेत तर भारंबा व भारंबा तांडा गावे चिकलठाण गटातून पिशोर गटात गेले आहे. मक्रणपूर गाव चापानेर गणातून अंधानेर गणात गेले आहेत. निवडणूकिमध्ये कन्नड तालुक्यात जिल्हा परिषद ८ गट आणि पंचायत समिती १६ गण तयार करण्यात आले होते. २०२२ मधील निवडणुकीसाठी जिल्हा परिषद गटामध्ये १ गट व पंचायत समिती गणामध्ये २ गणाची वाढ झाली होती. १२ जून २०२५ च्या आदेशान्वये कन्नड तालुक्यात जिल्हा परिषदेचे ८ गट व पंचायत समितीचे १६ गण संख्या आहे. राज्य शासनाकडून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वजनिक निवडणुकीकरीता प्रभाग रचना कार्यक्रम जाहिर केला आहे. यामध्ये १४ जुलै २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. २१ जुलै २०२५ रोजी पर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे यावर हरकती नोंदवता येणार आहे.

कन्नड तालुक्यातील आठ गट कंसात अंतर्गत ग्रामपंचायत व सलग्न गण

(१) नागद (१९), अंधानेर, (२) करंजखेडा(१५) घाटशेंद्रा, (३) चिंचोली लिंबाजी(१७), नाचनवेल, (४) पिशोर(१३) निंभोरा. (५) कुंजखेडा(१७), चिकलठाण. (६) हतनूर(१८), चापानेर (७) जेहूर(२३), औराळा, (८) देवगाव रंगारी(१६), ताड पिंपळगाव.

## संभाजीनगरसाठी लो-एमिशन झोन धोरणातून २३३ कोटींची संधी

छत्रपती संभाजीनगर , १४ जुलै २०२५: इंटरनॅशनल कौन्सिल ऑन क्लीन ट्रान्सपोर्टेशन च्या नव्या अभ्यासात स्पष्ट करण्यात आलं आहे की, जर छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) मध्ये नीट डिझाइन केलेला लो-एमिशन झोन तयार केला गेला, तर पर्यावरणीय आणि सार्वजनिक आरोग्यदृष्टीने सुमारे २३३ कोटींचा फायदा होऊ शकतो.

या शहराला गेल्या अनेक वर्षांपासून वायूप्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. यासाठी येथे एक व्यापक स्वच्छ हवा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. आयसीसीटी ने अर्बन रिसर्च फाउंडेशन आणि इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट अँड डेव्हलपमेंट पॉलिसी यांच्या सहकार्याने एलईजेड चे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

एलईजेड म्हणजे असे शहरी क्षेत्र जेथे सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर बंदी घालण्यात येते किंवा ते टप्प्याटप्प्याने वापराबाहेर काढले जातात. हे धोरण प्रामुख्याने जुन्या, जास्त उत्सर्जन करणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालते आणि शून्य-उत्सर्जन वाहतूक पर्यायांना चालना देते.

शहरातील उत्सर्जन प्रोफाइलवरून दिसून येते की दुचाकी वाहने हे प्रमुख प्रदूषण करणारे घटक आहेत - एकूण वाहन नोंदणीपैकी ७०% पेक्षा अधिक असून सर्व प्रकारच्या प्रमुख प्रदूषक घटकांमध्ये त्यांचे योगदान सर्वाधिक आहे. भारत स्टेज ३ (बीएस ३ ) वाहने, जरी आता तयार केली जात नसली तरी आजही मोठ्या प्रमाणावर वापरात असून ती झच् आणि छज्ु मध्ये सर्वाधिक योगदान देतात. ६ ते १५ वर्षे जुनी वाहने सर्वाधिक प्रदूषण करत असल्याचे आढळून आले आहे, यावरून हे स्पष्ट होते की जुन्या आणि उच्च प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे.

आयसीसीटी चे भारत व्यवस्थापक अमित भट्ट म्हणाले:

आमचा अभ्यास स्पष्टपणे दाखवतो की लो-एमिशन झोन ही केवळ पर्यावरणीय गरज नाही, तर आर्थिक संधी देखील आहे. स्वच्छ वाहनांना प्राधान्य देऊन आणि प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा वापर कमी करून, संभाजीनगरसारखी शहरे सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करत आर्थिक आणि सामाजिक लाभ मिळवू शकतात.

आयसीसीटी मधील संशोधक मूर्ती नायर म्हणाले:

पर्यटन, शेती आणि सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध असलेल्या छत्रपती संभाजीनगर सारख्या शहराने वाहतूक प्रदूषणाचे दुष्परिणाम दुर्लक्षित करता कामा नये. नीट आखलेला लो-एमिशन झोन हा इतर शहरांसाठी आदर्श ठरू शकतो - पण यासाठी अनेक घटक, विभाग व समुदायांमधील समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे.

## एसबीआय बँक कडून विमाचा धनादेश वाटप

कन्नड :दि.१५ जुलै - शहरातील भारतीय स्टेट बँक शाखा कन्नड येथे मंगळवार दि.१५ रोजी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा २ लाखांचा धनादेश मयत विठ्ठल बाबुराव जंगले यांच्या पत्नी नंदा जंगले यांना शाखा व्यवस्थापक मुकुंद कुमार यांच्या हस्ते देण्यात आला विठ्ठल जंगले यांचा ९ एप्रिल २५ रोजी अल्पशा आजाराने मृत्यू झाला होता त्यांचे बचत खाते भारतीय स्टेट बँक शाखा कन्नड येथे असल्याने त्यातुन प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा विमा काढण्यात आला होता त्या अनुषंगाने त्यांच्या मृत्यूनंतर वारसांना या



विम्याद्वारे हा धनादेश देण्यात आला , नैसर्गिक मृत्यूलाही संरक्षण देणारी ही भारत सरकारद्वारे पुरस्कृत विमा योजना आसुन बचत खात्याच्या सर्व लाभार्थ्यांसाठी अत्यंत माफक दरात हा विमा उपलब्ध असून तो सर्वांनी घ्यावा असे आवाहन शाखा व्यवस्थापक मुकुंद कुमार यांनी खातेदारांना केले.यावेळी यावेळी सेवा व्यवस्थापक स्नेहल मंगले, लोन ऑफिसर अमित पाटील, बँक सहाय्यक रोहिणी काळे, कॅशियर निलेश वासनिक, प्रणव गोंडणे, पुमम विक्के,मुनाजीप खान पठाण, बाबुराव पवार, दादासाहेब शिरसाट तेजस गायकवाड, यांच्यासह बँक खातेदार उपस्थित होते.

## देशमुख नगर येथे कलश स्थापना सपन्न

छत्रपती सभाजीनगर प्रतिनीधी : देशमुख नगर स्थित मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिरांमध्ये उपाध्याय विरंजन सागर जी महाराज ससंघ च्या सानिध्यात कलश स्थापना करून चातुर्मासाची यथोचित सुरुवात झाली याप्रसंगी प्रवचनात म्हटले की, भगवान महावीरांची दिव्य ध्वनी ही जवळजवळ ६५ दिवस खिरली नाही कारण की ऐकायलाही पात्र चांगलं लागतं! ऐकायला आणि ती समजून घ्यायला पात्र चांगलं नव्हतं त्यानंतर ६६ व्या दिवशी ते पात्र गौतम गणधर रूपाने मिळालं आणि भगवंताची वाणी खिरू लागली आणि आपल्याला धर्माविषयी कळू लागले! त्या दिवसापासूनच वीर शासन जयंती हे आपण खऱ्या अर्थाने साजरी करू लागलो गुरुदेवांनी याप्रसंगी समस्त दिगंबर जैन समाजाला किमान पाच मिनिट तरी स्वाध्याय करायला सांगितले व तसे करण्यास नियमही घेण्यास प्रवृत्त केले! वीर शासन जयंती पासून मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिरात रोज सकाळी ८ वाजेपासून तर ९.१५ पर्यंत रयणसार या महाग्रंथा वरती प्रवचनहोणार आहे आपलं ज्ञान वाढवण्यासाठी आपण या प्रवचनाचा लाभ घ्यावा असे देशमुख नगर दिगंबर समाजाने आव्हान केलेले आहे!

## महिला राष्ट्रवादी कॉग्रेंसची जनजागृती मोहीम कॉलेजवयीन विद्यार्थ्यांशी सक्षम तु अभियानाच्या माध्यमातून आत्मसंरक्षासंदर्भात संवाद

खुलताबाद प्रतिनिधी- शालेय जीवनातील प्रत्येक टप्पा अतिशय महत्वाचा व प्रत्येक शिकवण मनावर कोरणारी असते. या दिवसांमध्ये शिक्षण घेत असताना मिळालेले बाह्यज्ञान, सामाजिक भान एक प्रगल्भ व सुजाण नागरिक घडवतो, त्यामुळे महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्ष कॉलेज व शाळेत शाळेत सक्षम तू अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदेविषयक, पोक्सो, सायबर गुन्हेगारी संदर्भात, टोल फ्री नंबर माहिती, आत्मसंरक्षणासंदर्भात पोलीस, समुपदेशन, बीट मार्शल व दामिनी पथक यांच्या माध्यमातून



कॉलेजवयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधून जनजागृती मोहीम राबवित असल्याची माहिती महिला जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस अनिताताई बोरसे यांनी दिली. या संदर्भात त्यांनी आज मंगळवारी खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, गटशिक्षणाधिकारी सचिन वाघ यांना भेटून अत्यंत महत्वाच्या व संवेदनशील विषयांसाठी आपण सहकार्य करण्याचे आवाहन केले. शालेय व महाविद्यालयात याबाबत खुलताबाद तालुक्यात जनजागृती करण्यात येत असल्याचे अनिताताई बोरसे यांनी सांगितले.

तुमच्या उज्वल भविष्यासाठी सुलभकर्ज प्रक्रियेची हमी...!

**कॅश क्रेडीट लोन**
५,००,००० ते १००,००,००० पाच लाख ते एक कोटी

**वैयक्तिक कर्ज**
३०,००० ते १,००,००० तीस हजार ते एक लाख

**होम लोन कर्ज**
१,००,००० ते १००,००,००० एक लाख ते एक कोटी

**मॉर्गेज लोन**
१,००,००० ते १००,००,००० एक लाख ते एक कोटी

**वाहन तारण लोन (कर्ज)**
वाहन कोटेशनच्या ७५% कर्ज मंजुर केले जाईल

**बुधवार -१६/०७/२०२५**

**श्री रेणुकामाता मल्टिस्टेट**

को. ऑप. अर्बन क्रेडिट सो. लि. अहमदनगर
बिडकीन शाखा, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, मारवाड गल्ली, बिडकीन., मो.नं. ९२२५३२३२२३

**भव्य लोन मेळावा**

जागेवर तात्काळ मंजूरी

| | | |
|---|---|---|
| १,००,०००/- घ्या व दर महिना ९०२६/- १२ महिने १५% | ५०,०००/- घ्या व दर महिना ४५१३- १२ महिने १५% | ३०,०००/- घ्या व दर महिना २७०८/- १२ महिने १५% |

ठेवीचे आकर्षक व्याजदर
३१ दिवस ते ६ महिने ८.५०% (द.सा.द.शे.)
* ६ महिने ते १ वर्ष ९.५०% (द.सा.द.शे.)
* १ वर्षाच्या पुढे १०% (द.सा.द.शे.)
* दाम दुप्पट ठेव ८४ महिने
* मासिक प्याज प्राप्ती (MIS) १३ महिन्यापेक्षा जास्त १०.००%
* ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, दिव्यांग व्यक्ती, माजी सैनिकांना ०.५०% जास्त व्याजदर
* आवर्त ठेव योजना १२ महिने पूर्ण १०.००%
* १००० दरमहा भरा व ७३ महिन्यानंतर १ लाख रुपये मिळवा
* NCP. शेअर स्कीम ११.००% फिक्स डिव्हीडंड १ वर्ष व त्यापुढे (नियम व अटी लागू)

ए.टी.एम कार्ड सुविधा उपलब्ध

नातं विश्वासाचं... श्रध्देचं !

**श्री रेणुकामाता मल्टीस्टेट**

को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि.अ.नगर

ठेवीवर आकर्षक व्याजदर १०.००% | एका कॉलवर बँकिंग सेवा आपल्या दारी | सर्व बँकेचे कार्ड स्वैपिंग सुविधा | मोबाईल बँकींग सुविधा

प्रधान कार्यलय - रेणुकाभवन, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी अहमदनगर (महाराष्ट्र) ४१४००३ फोन नं. ९९२३२४१६५१
web. www.renukamatamultiste.com Email: callcenterrenukamatamultistate.com
Toll Free No. 1800-233-4140

## कै.अँड.आशिष पालोदकर यांच्या स्मृतीदिनी वह्या वाटप कार्यक्रम संपन्न



दि.१५ प्रतिनिधी :- राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे दिवंगत कोषाध्यक्ष अँड.आशिष प्रभाकरराव पालोदकर यांच्या तृतीय स्मृतीदिनी येथील महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गरजवंत विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकांसह इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप विद्यालयाचे प्राचार्य देशमुख एम.व्ही.व जेष्ठशिक्षक झेलवार. एस.डी. प्राथमिक चे मुख्याध्यापक सचिन पालोदकर सर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य देशमुख यांनी अँड. पालोदकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक के.एस.पाटील, एस.एन.पायघन, पी.जी.पालोदकर, बी.एस. जंगले,एल.के.पालोदकर, डी.के.तायडे, शिक्षिका सुर्यवंशी मँडम, प्रा.के. एस.घोंगडे, प्रा.ए.के.बुलबुले, डॉ.जी.पी.डापके, प्रा.के.एन.मोरे यांसह प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन पालोदकर, शिक्षक व्ही. डी.जाधव, शिक्षिका पी.डी.परदेशी व सहकारी शिक्षक,शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिनेश दसरे,वाडोने सर,बोरसे व विजय पवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन जेष्ठशिक्षक शांतीलाल झेलवार यांनी केले.

## टाटा हिताचीने शिनराय प्राइम सीईव्ही ५ लॉन्च केले

छत्रपती संभाजीनगर - भारतातील कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट क्षेत्रातील आघाडीची कंपनी टाटा हिताचीने आज शिनराय प्राइम सीईव्ही ५ या नवीन पिढीच्या बॅकहो लोडरचे लाँचिंग केले. हे मशीन विश्वास, टिकाऊपणा आणि उत्कृष्ट कामगिरी या गोष्टींचा नव्या पद्धतीने अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आले आहे.शिनराय प्राइम हे मशीन नवीन सीईव्ही ५ नियमांनुसार तयार करण्यात आले आहे, त्यामुळे हे इंधनाची जास्त बचत करते, कमी आरपीएमवर जास्त ताकद देते आणि प्रदूषण कमी करते. हे मशीन उच्च दर्जाच्या स्टीलपासून आणि रोबोटिक वेल्डिंगने बनवले असून, ते मजबूत आणि कठीण परिस्थितीत काम करण्यास सक्षम आहे.हा लाँचिंग कार्यक्रम १४ जुलै रोजी, हॉटेल नंदिनी, बीड बायपास रोड, संभाजीनगर, औरंगाबाद येथे संपन्न झाला.

### जाहीर प्रगटन

**मा. डी. एस. तांबे मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ३४८/२०२५ पु. ता. २१/०८/२०२५

अर्जदारः- १- रमेश शेकु निकम, वय- ५० वर्षे, धंदा- शेती, रा. वासडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- लक्ष्मीबाई भ्र. रमेश निकम, वय- ४६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वासडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- वैभम पि. रमेश निकम, वय २१ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. वासडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ व २ हे पती पत्नी असुन अर्जदार क्र. ३ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचा मुलगा व अर्जदार क्र. ३ याचा भाऊ नामे गणेश रमेश निकम हा होता तो दिनांक ०४/०८/२०२४ रोजी मौजे बोरगाव बाजार येथे अपघाती मयत झालेले असुन त्याचा अंत्यविधी हा मौजे वासडी ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना मयत गणेश रमेश निकम याचं वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध शासकीय य निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे अस दिनांक ०४/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ०९/०७/२०२५

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २७३/२०२७ पुढील तारीखः १८/८/२५

अर्जदार : महेश पिता शिवाजी निकम, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. टाकळी अंतुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

- विरुध्द-

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद / छत्रपती संभाजीनगर

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. जे.सी.मगर, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, शिवाजी पुंडलिक निकम व छाया भ्र. शिवाजी निकम रा.टाकळी अंतुर ता. कन्नड येथील रहिवाशी असून आपसात पती पत्नी होते. शिवाजी पुंडलिक हे दिनांक २७.४.२००७ रोजी मौजे टाकळी अंतुर ता. कन्नड येथे मयत झाले. तसेच त्यांची पत्नी छाया शिवाजी निकम या दिनांक २९.७.२०१२ रोजी त्यांचे माहेरी मौजे लोहगांव ता. कन्नड येथे मयत झाल्या आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना विवाह संबंधातून एक मुलगा महेश शिवाजी निकम हा झालेला आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदारा व्यतीरिक्त कोणीही वारस नाही. मुळ अर्जा सोबत ग्राम पंचायत टाकळी अंतुर व लोहगांव यांनी दिलेले मृत्यु प्रमाण पत्र अर्जदारांनी अर्जा सोबत दिलेले आहे. मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदार हा एकमेव कायदेशीर वारस आहे. मथत शिवाजी पुंडलिक निकम हे एम.एस.ई.बी.सब स्टेशन चिंचोली येथे विज सेवक म्हणून कार्यरत होते. शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांचे पश्चात अर्जदार यास अनुकंपातत्वावर त्याचे वडीलांचे जागेवर नौकरी मिळण्यासाठी व ईतर शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक ०६.०५.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ३०.०५.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक ३०.०५.२०२५

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाचे स्वागत

सुमारे दीड महिन्यापूर्वी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही मुद्रित माध्यमांत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीविषयी संशय व चिंता व्यक्त करणारे लेख प्रसिद्ध केले होते. त्याआधी फेब्रुवारी महिन्यात लोकसभेतही त्यांनी हाच सूर आळवला होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाली असून त्यावर निवडणूक आयोग विचित्रपणे पांघरूण घालत असल्याचा आक्षेप घेताना मतदारयाद्यांमध्ये बनावट मतदारांची नावे घुसविल्याचा व मतदारयादी फुगविल्यामुळे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात मतदारांच्या एकूण संख्येपेक्षा अधिक मतदान झाल्याचा शोधही राहुल गांधी यांना लागला होता. राहुल गांधी यांनी उभ्या केलेल्या वादास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिवाद करून प्रत्येक आरोप खोडून काढला, तेव्हा फडणवीस यांना हिणविण्याचे राजकारणही केले गेले. ज्यांना जनतेने नाकारले, ते अशा आक्षेपांचा आधार घेत जनादेशालाच नाकारत आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुल गांधींच्या त्या आरोपांची खिल्ली उडविली होती. त्याच दरम्यान निवडणूक आयोगानेही राहुल गांधी यांच्या आक्षेपांस प्रत्युत्तर देऊन ते आरोप हास्यास्पद व बिनबुडाचे ठरविले होते. आरोप-प्रत्यारोपांची ही मालिका महाराष्ट्र विधानसभेच्या निकालांनंतर लगेचच सुरू झाली, तेव्हा गेल्या वर्षी, २४ डिसेंबर रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसचे सर्व आक्षेप फेटाळत लेखी प्रत्युत्तरही दिले आणि जूनमध्ये राहुल गांधींच्या लेखानंतर तेच प्रत्युत्तर पुन्हा प्रसृत केले होते. याच संदर्भात एक बाब महत्त्वाची व लक्षवेधी ठरते. गांधींच्या अशाच आक्षेपाच्या सुरात सूर मिसळणारी एक याचिका त्या दरम्यान सुनावणीसाठी उच्च न्यायालयासमोर होती. प्रकाश आंबेडकर यांनी हा सूर हिरीरीने न्यायालयातही आळविला होता. न्यायालयाने हे सारे आक्षेप फेटाळून तर लावलेच; पण अशी याचिका केवळ संभ्रम पसरविण्याच्या व न्यायालयाचा वेळ वाया घालविण्याच्या उद्देशाने केली गेल्याचा ठपका ठेवत याचिकाकर्त्याचे कानही उपटले होते. म्हणजे निवडणुका, मतदार याद्यांची स्पष्टता व निवडणूक आयोगाची भूमिका याबाबत काँग्रेसकडून गेल्या सुमारे सात महिन्यांपासून सुरू असलेल्या वादातून पसरणाऱ्या संभ्रमांचे पितळ उघडे पडले असताना, आता बिहारमधील निवडणुकांच्या तोंडावर आयोगाने हाती घेतलेल्या मतदार याद्यांच्या शुद्धीकरण प्रक्रियेवरही पुन्हा शिंतोडे उडविण्याचा खेळ सुरू झाला आहे. येत्या वर्षअखेरीस बिहार विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्याआधी मतदारयाद्या पारदर्शक असाव्यात यासाठी निवडणूक आयोगाने व्यापक मोहीम उघडली आहे. एका अर्थाने, मतदारयाद्यांचे शुद्धीकरण सुरू झाले आहे. मतदारयादीमध्ये अनधिकृतपणे घुसविले गेलेले बोगस मतदार शोधणे, परदेशी नागरिकांची नावे घालून मतदानाचा अधिकार नसलेल्यांकरवी लोकप्रतिनिधी निवडण्याच्या राजकारणास आळा घालणे व कायदेशीररीत्या मतदानास पात्र असलेल्या भारतीय नागरिकांकरवी लोकप्रतिनिधी निवडला जावा यासाठी मतदान प्रक्रिया कठोरपणे राबविणे ही निवडणूक आयोगाची नवी नीती आता प्रदूषित राजकारणास शह देणारी ठरणार, हे स्पष्ट होऊ लागले आहे. बिहारच्या २४३ विधानसभा मतदारसंघांतील मतदारयाद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेदरम्यान स्पष्ट होत असलेल्या बाबी धक्कादायक आणि राजकीय हेतूने लढविल्या जाणाऱ्या निवडणुकांच्या प्रक्रियेवर झगझगीत प्रकाशझोत टाकणाऱ्या आहेत. गेल्या सुमारे चार दशकांत ज्या मतदारांच्या मतदारयादीमध्ये नोंदी झाल्या, त्यांची काटेकोर छाननी करण्याची मोहीम हाती घेतल्यानंतर, बिहारमधील याद्यांमध्ये नेपाळी, बांगलादेशी, म्यानमारच्या रोहिंग्यांची मतदार म्हणून घुसखोरी झाल्याचे स्पष्ट झाले आणि निवडणुका जिंकण्याच्या नीतीचे किती अध:पतन झाले, याची चुणूकही दिसू लागली. मतदारयाद्यांच्या छाननीचे काम २५ जुलैपर्यंत चालणार आहे. आतापर्यंतच्या छाननीतून समोर येणारे वास्तव चक्रावून टाकणारे आहे. बिहार निवडणुकीसाठी तैनात यंत्रणेने घरोघरी जाऊन मतदारांच्या याद्या पडताळून पाहण्याचा धाडसी निर्णय घेतल्यानंतर, नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधून बेकायदा घुसखोरी केलेल्यांची नावेदेखील या याद्यांमध्ये समाविष्ट असल्याची बाब स्पष्ट झाली. आता सखोल छाननीनंतर अशा रीतीने घुसविल्या गेलेल्या नावांना कात्री लागेल आणि नव्या याद्या प्रसिद्ध होतील. आतापर्यंत बिहारमधील ८० टक्के मतदारांनी आपली माहिती आयोगासमोर सादर केली असल्याने, उघडकीस आलेल्या घुसखोरीचे स्वागत होणे अपेक्षित होते; प्रत्यक्षात आयोगाच्या छाननीवर आक्षेप घेण्यामागची धास्ती नेमकी कशापायी, याचे उत्तर गुलदस्त्यात असले, तरी त्याचा अंदाज घेणे फारसे अवघड नाही. महाराष्ट्रातील मतदारयाद्यांमध्ये बनावट नावे घुसविल्याचा आक्षेप घेणारे व अन्य विरोधी नेते आता बिहारच्या मतदारयाद्यांमध्ये घुसविली गेलेली बेकायदा मतदारांची नावे वगळण्यास आक्षेप घेत नसल्याने हा विरोधाभास ध्यानात घ्यावयास हवा.

बिहारमध्ये मतदारयाद्यांच्या छाननीस आक्षेप घेणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहे. मात्र, अशी छाननी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार अबाधित असल्याचा निर्वाळा देऊन सर्वोच्च न्यायालयाने अशा आक्षेपांची हवा काढून घेतल्यानंतर आता संपूर्ण देशात मतदारयाद्यांची छाननी करण्याचे संकेत निवडणूक आयोगाकडून मिळू लागताच, महाराष्ट्रातील याद्यांवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्यांनी आता घूमजाव पवित्रा घेतलेला दिसू लागला आहे. पुढच्या वर्षी आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यातही निवडणुका होणार आहेत. त्याअगोदर देशभरात मतदारयाद्यांचे शुद्धीकरण करून घुसखोरांची याद्यांमधून हकालपट्टी करण्याच्या आयोगाच्या निर्णयाचे स्वागत करावयास हवे. कारण या देशातील लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार केवळ या देशातील पात्र मतदार असलेल्या नागरिकांनाच आहे. आजवर अशा घुसखोरीमुळे निवडणूक प्रक्रियेत किती गढूळपणा आला असेल, याचा अंदाज करणे आता काहीसे अवघड आहे. शुद्धीकरणाची ही नवी प्रक्रिया मात्र भारताच्या लोकशाहीस सुदृढ करण्यास निश्चितच साह्यभूत ठरणार असताना अचानक त्याच्या विरोधात दंड थोपटण्याच्या राजकारणास नेमके काय साधावयाचे आहे, हा प्रश्न मतदारांच्या मनात येत राहील. बिहारमधील मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणानंतर राज्यातील एकूण मतदारांच्या संख्येत मोठी घट होईल, हे स्पष्ट आहे. काही राजकीय पक्षांना आपला मोठा जनाधार गमावण्याची भीती आहे. त्यामुळेच बोगस मतदार ठरवून मतदारांची नावे वगळण्यात येत असल्याचा कांगावाही काही नेत्यांकडून सुरू झाला आहे. अशा प्रकारे मतदारयाद्यांतील नावे वगळली गेल्यास अनेक मतदारसंघांतील प्रस्थापित नेत्यांच्या विजयास धक्के बसतील ही त्यामागील भीती आहे, हेही स्पष्ट आहे. बिहारमध्ये ७ कोटी ९० लाख मतदार आहेत. छाननीनंतर यातील जवळपास एक टक्का मतदारांची नावे वगळली जातील, अशी शक्यता वर्तविली जात आहे. तसे असेल, तर जवळपास ७ लाख ९० हजार नावे वगळली जातील. याचाच अर्थ २४३ मतदारसंघांपैकी प्रत्येक मतदारसंघात किमान सुमारे ३ हजार २०० नावे वगळली गेली, तर त्याचा प्रस्थापित नेत्यांच्या निवडणुकीवर होणारा परिणाम राजकीयदृष्ट्या परवडणारा नसेल, हेही स्पष्ट आहे. २०२० मधील विधानसभा निवडणुकीत किमान ४० मतदारसंघांतील विजयी उमेदवार व पराभूत उमेदवाराच्या मतांमधील फरक तीन हजार ते साडेतीन हजारांएवढा होता. काही उमेदवार केवळ १२ मतांनी विजयी झाले होते. यावरून नावे वगळली गेल्यास कोणास किती फटका सोसावा लागेल, त्याचा अंदाज करता येणे अवघड नाही. तसे चित्र स्पष्ट झाले, तर देशभरातील मतदारयाद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेतून कोणाची बेरीज होईल, कोणास वजाबाकीचा फटका बसेल, याचा अंदाजही अवघड होणार नाही. सध्या सगळीकडेच प्रदूषण माजले आहे आणि प्रदूषणास आळा घालण्याचा आग्रह धरला जात आहे. असे असताना, निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांतील प्रदूषण रोखण्यासाठी उचललेल्या या पावलांचे स्वागत होणे गरजेचे नाही काय?

## प्रासंगिक

# जिवंत हुतात्मा : सदानंदन् मास्टर

**शेफाली वैद्य**

केरळ राज्य त्यांना आज 'जिवंत' हुतात्मा म्हणून ओळखते. चष्मा लावलेले, जवळजवळ सहा फूट उंच, वयाच्या पन्नाशीतही बलदंड शरीरयष्टी टिकवून असलेले सदानंदन् मास्टर जेव्हा त्यांच्या विद्यार्थ्यांना इतिहास शिकवण्यात रंगून गेलेले असतात, तेव्हा त्यांच्याकडे बघून वाटतही नाही की त्यांचे दोन्ही पाय गुडघ्यापासून तुटलेले आहेत. गेली वीस वर्षे सदानंदन् मास्टर कृत्रिम पाय लावून वावरतात, पण त्यांच्या उत्साहात, काम करण्याच्या शक्तीत जराही बदल नाही. त्यांचे विद्यार्थी त्यांना 'माशे' म्हणून ओळखतात. आपल्या या लाडक्या शिक्षकासाठी सदानंदन् मास्टर यांचे विद्यार्थी काय वाट्टेल ते करायला तयार आहेत.

१९९४ साली जेव्हा सदानंदन् मास्टरांना आपले दोन्ही पाय गमवावे लागले, तेव्हा ते फक्त तीस वर्षांचे होते. त्यांना अपघात झाला नव्हता किंवा कुठला आजारही झाला नव्हता. सदानंदन् यांचे पाय केरळमधल्या कम्युनिस्ट गुंडानी अत्यंत क्रूरपणे करवत वापरून गुडघ्यांपासून कापून टाकले होते, तेसुद्धा भर बाजारात. सदानंदन् मास्टरांचा गुन्हा एकच होता, साम्यवादी विचारांची परंपरा असलेल्या कुटुंबात जन्मूनदेखील त्यांनी राष्ट्रवादी विचारांकडे वळण्याचं धाडस केलं होतं. कम्युनिस्ट वडिलांचा मुलगा संघविचारांनी प्रभावित होऊन स्वयंसेवक झाला होता, तेही केरळच्या कन्नूर जिल्ह्यात; जो जिल्हा केरळमधल्या साम्यवादी हिंसाचाराचा मूळ स्रोत आहे. दुसऱ्या कुठल्याही विचारप्रणालीचे वारे जरी इथे फिरकले तरी अत्यंत क्रूर पद्धतीने त्या विचारसरणीच्या लोकांचा समूळ बीमोड करण्यात येतो आणि तरीही, राष्ट्रवादी विचार केरळमध्ये संघाच्या रूपाने रुजतोय, वाढतोय. सदानंदन् मास्टर हे त्या रुजत्या वाढत्या राष्ट्रवादाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत.

ही आहे सदानंदन् मास्टर यांची कहाणी, त्यांच्याच शब्दात सांगितलेली. मी कन्नूर जिल्ह्यामधल्या मट्टनूर जवळच्या एका छोट्या गावात वाढलेला मुलगा. वडील कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. मोठा भाऊ कम्युनिस्ट पक्षाच्या युवा शाखेचे काम करायचा. साहजिकच लहानपणापासून मलाही साम्यवादी विचारांचेच बाळकडू मिळालेले. कन्नूर जिल्हा म्हणजे केरळमधल्या साम्यवादाची प्रयोगशाळा. कन्नूरमधल्या पिनरई या गावात पहिल्यांदा साम्यवादी विचार रुजला. सध्याचे केरळचे मुख्यमंत्री पिनरई विजयन् हे याच गावचे. त्यांच्यावर राजकीय हिंसाचाराचे आरोपही आहेत. कन्नूरमध्ये दुसऱ्या कुठल्याही विचारसरणीला पाय रोवू द्यायचा नाही हे कम्युनिस्ट पक्षाने ठाम ठरवलेले. त्यामुळे इथला कुणीही रहिवासी राष्ट्रीय विचारांकडे आकृष्ट होताना दिसला की त्याच्याविरुद्ध, त्याच्या कुटुंबाविरुद्ध पद्धतशीरपणे मोहीम राबवली जायची. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्येही कन्नूरमध्ये संघकार्याची स्थापना झाली. साम्यवाद्यांच्या दादागिरीला कंटाळलेले, कम्युनिस्ट विचारांमधला फोलपणा उमजू लागलेले माझ्यासारखे काही तरुण संघविचारांकडे वळायला लागले.

मी कॉलेजमध्ये असताना एसएफआयचं काम करायचो. पण तोपर्यंत मला कळून चुकलेले होते की साम्यवादी विचारसरणीतून भारताला भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळणे शक्य नाही. दरम्यान माझी गावात काम करणाऱ्या काही संघाच्या कार्यकर्त्यांशी ओळख झाली.



त्यांची देशकार्याविषयीची तळमळ, भारताला सतावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे इथल्या मातीतच शोधणारी संघाची विचारसरणी याचा माझ्या मनावर नकळतच परिणाम होत गेला आणि मी संघविचारांकडे आकृष्ट झालो. अधूनमधून शाखेत जायला लागलो. वडिलांनी मला संघविचारांकडे वळण्यापासून परावृत्त करायचा प्रयत्न केला खरा, पण त्यात फार जान नव्हती; कारण तोपर्यंत ते स्वतःही कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीला थोडेसे कंटाळले होते. माझ्या जीवाला काही धोका होऊ नये म्हणून ते मला अडवत होते. मी संघविचारांकडे वळलेला बघून एसएफआयमध्ये माझ्याबरोबर काम करणारे मित्र मात्र खूप अस्वस्थ झाले. त्यांनी माझं मन वळवायचा खूप प्रयत्न केला. पण कम्युनिस्टांची अरेरावी, त्यांचा हिंसेकडे असलेला कल, कुठलाही विरोधी विचार निर्घृणपणे चिरडून टाकायची त्यांची असहिष्णू वृत्ती यामुळे माझा पुरता भ्रमनिरास झाला होता. मी स्वतःला पूर्णपणे संघकार्याला वाहून घेतलं.

आमच्या गावात संघ कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन श्रमदानाने एक बस-थांबा उभारला होता. केरळवर राज्य करणाऱ्या कम्युनिस्टांच्या नाकर्तेपणाचा तो बस थांबा एक प्रतीक होता. जे सरकार करू शकले नाही, ते संघशक्तीने साध्य करून दाखवले होते. त्यामुळे तो बस थांबा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या डोळ्यात सलत होता. १९९३ मध्ये सप्टेंबरच्या आठ तारखेला कम्युनिस्टांनी कन्नूरमध्ये बंद पुकारला होता. त्या दिवशी काही कम्युनिस्ट गुंडांनी झुंडीने येऊन तो बस थांबा तोडायला सुरुवात केली. माहिती मिळताच आम्ही संघ कार्यकर्तेही तिथे पोचलो. दोन्ही गटांमध्ये मारामारी झाली. मलाही बेदम मारहाण झाली. आम्ही केलेला प्रतिकार कम्युनिस्टांना आवडला नाही. मी त्यांच्या डोळ्यात खूपच सलत होतो. मला जन्मभर लक्षात राहील असा धडा शिकवलाच पाहिजे, असे कम्युनिस्टांना वाटत होते. अजूनही तो दिवस अगदी जसाच्या तसा आठवतो. २५ जानेवारी १९९४ ची संध्याकाळ. मी फक्त तीस वर्षांचा होतो तेव्हा. बहिणीचे लग्न काही दिवसांवर आले होते. त्या संदर्भात काही बोलणी करायला म्हणून माझ्या काकांकडे गेलो होतो. आनंदात होतो मी. माझेही लग्न ठरले होते. माझ्याच बी.एड च्या वर्गात शिकणाऱ्या वनिता नावाच्या मुलीबरोबर. आम्ही दोघांनी प्रेमाच्या आणा-भाका घेतल्या होत्या. दोघांचेही शिक्षण संपले होते आणि दोघांनी मिळून संसाराची उज्ज्वल स्वप्ने बघितली होती. आपल्यापुढे काय वाढून ठेवलंय याची आम्हा दोघानांही कल्पना नव्हती. काम आटोपून मी बसने रात्री आठ वाजता माझ्या गावात परतलो. घराजवळच्या बस स्टॉपवर मी उतरलो. ते, कम्युनिस्ट पक्षाचे भाडोत्री कार्यकर्ते वाटच पाहत होते. मी ओळखतही होतो काहींना चांगला. मला घेरून त्यांनी जेरबंद केलं. काहींनी आजूबाजूला गावठी बॉम्ब फेकले. त्या लोकांनी मला जमिनीवर पकडून ठेवलं आणि करवतीने माझे दोन्ही पाय गुडघ्यापासून खाली कापून काढले. त्या प्राणांतिक वेदना मी अगदी आजही विसरू शकलो नाही. पाय कापून ते कम्युनिस्ट गुंड थांबले नाहीत. त्यांनी दोन्ही कापलेले पाय दूर चिखलात फेकून दिले आणि माझ्या रक्ताळलेल्या गुडघ्यांना शेण फासलं. शस्त्रक्रिया करून माझे पाय परत जोडले जाऊ नयेत म्हणून त्यांनी घेतलेली ती खबरदारी होती. काम झाल्यावर मला तसेच तिथे बस स्टॉपवर रक्ताच्या थारोळ्यात तडफडत सोडून ते निघून गेले. मी तसाच तिथे बेवारशी जनावरासारखा पडून राहिलो, जवळजवळ अर्धा तास.

पोलिस आले तेव्हा मी ग्लानीत होतो. पोलिसांनी आणि इतर संघ कार्यकर्त्यांनी मिळून मला शहरात मोठ्या इस्पितळात नेले. एकाने दूर फेकलेले माझे पाय बरोबर घेतले. ते परत जोडता येतील म्हणून नव्हे, तर माझे पाय कसे कापून टाकले हे डॉक्टरांना कळावं म्हणून. दुसऱ्या दिवशी मी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या गुडघ्यांना पांढरंशुभ्र बँडेज बांधलेलं होतं आणि खाली? खाली काहीच नव्हतं. कालपर्यंत मी धडधाकट होतो अन् आज दोन्ही पायांनी पांगळा झालेलो होतो. त्याच दिवशी वनिता, माझी होणारी पत्नी मला भेटायला इस्पितळात आली. तिचा चेहरा पार विदीर्ण झाला होता. माझ्याजवळ होतं-नव्हतं ते धैर्य एकवटून मी तिला सांगितलं की, मी तिला तिच्या वचनातून मोकळं करतोय. तिने माझ्यासारख्या एका पांगळ्याबरोबर आता लग्न करू नये. तिच्या आई-वडिलांनीही तिला हेच सांगितलं. पण तिने मानेनेच नाही म्हणून सांगितलं.

जवळजवळ सहा महिने इस्पितळात होतो. आयुष्य मला निरर्थक वाटत होतं. कधीही कुणाचंही वाईट केलेलं नसताना हा भोग माझ्याच वाट्याला का यावा हे मला कळत नव्हतं. नैराश्याने ग्रासलं होतं मला. संघाचे कार्यकर्ते नित्य नियमाने माझ्या भेटीला यायचे. मला सतत बोलते ठेवायचे. मनाची उभारी टिकवून ठेवायला मदत करायचे. वनिता या सर्व काळात सतत माझ्या बरोबर होती. माझ्याशी लग्न करण्याच्या निश्चयापासून ती ढळली नव्हती. तिचा दुर्दम्य विश्वास आणि प्रेम, माझ्या कुटुंबीयांनी केलेली सेवा आणि संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेली अथक साथ, यामुळे मी नैराश्यातून बाहेर आलो. डॉक्टरांनी जयपूर फूट बसवला. हळूहळू परत चालायची सवय करू लागलो. खूप दुखायचं. पहिल्यांदा कृत्रिम पाय बसवताना कातडी सोलवटायची. प्रत्येक पाऊल उचलताना अपरिमित वेदना व्हायच्या. पण हळूहळू सवय झाली. मी परत पायावर उभा राहिलो. जवळजवळ वीस वर्षे मी कृत्रिम पाय लावून वावरतोय. तासन्तास शाळेत उभा राहून शिकवतोय. किंबहुना मला पाय नाहीत ही जाणीवच राहिलेली नाही. वनिताचे आणि माझे लग्न झाले. आम्ही एक छोटे घरकूलही उभारले. आम्हाला एक मुलगीही आहे. मी अजूनही संघाचे काम करतो. मी कोवळ्या मुलांना शिकवतो. संघ देशावर प्रेम करायला शिकवतो. एखाद्या व्यक्तीचा किंवा समाजधारेचा द्वेष करायला नाही. मला विद्यार्थ्यांना देशप्रेम शिकवायचंय. कुठल्यातरी परकीय देशात उगम पावलेला विदेशी 'ईझम' शिकण्यापेक्षा त्यांनी या देशावर, या मातीवर प्रेम करायला शिकावे.

पिनरई विजयन् मुख्यमंत्री झालेत तेव्हापासून केरळमध्ये कम्युनिस्टांचा हिंसाचार पुन्हा एकवार उफाळून आलाय. केरळच्या काही भागांत ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा अनिर्बंध संचार आहे. तरीही राष्ट्रप्रेमाची ज्योत केरळमध्ये सदैव तेवत राहील. कारण ही आदी शंकराचार्यांची जन्मभूमी आहे. संघाचा, राष्ट्रीय विचारांचा प्रभाव केरळमध्ये हळूहळू पण निश्चितपणे वाढतो आहे. मला खात्री आहे की काही वर्षात परिस्थिती जरूर बदलेल.

## वेध

**नितीन शिरसाट**

# अकरावी प्रवेश; पालकांची चिंता आणि वास्तव

यावर्षी राज्यातील दहावीच्या परीक्षेत तब्बल २१ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ही संख्या ऐतिहासिक पातळीवर असताना फक्त ५ लाख ८ हजार विद्यार्थ्यांनीच आतापर्यंत अकरावीसाठी प्रवेश घेतला आहे. ही विषमता केवळ आकडेवारीची नसून तिच्यामागे राज्यातील शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी धोरणातील विसंगती, ग्रामीण-शहरी शिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमांची दरी, आर्थिक अडचणी आणि ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे गुंतागुंतीचे स्वरूप आहे.

अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर राज्यभरातून एक लाख विद्यार्थ्यांनी नव्याने नोंदणी केली. यावरून स्पष्ट होते की अनेक विद्यार्थी यादीत नाव न आल्यामुळे नोंदणीपासून वंचित राहिले होते. शहरी भागातील नामांकित विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ८० ते ८८ टक्क्यांपेक्षा अधिक गुणांची छाननी सुरू असल्याने सरासरी विद्यार्थी प्रवेशासाठी अपात्र ठरतात. ही गुणवत्ता ग्रामीण विद्यार्थ्यांना तर अधिकच दूर लोटते. शासनाने यावर्षी प्रथमच संपूर्ण अकरावी प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन केल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना त्यांच्या तालुक्यात प्रवेश मिळणे कठीण झाले आहे. स्थानिक महाविद्यालयात ऑनलाईन अर्ज करून त्याचे नाव पहिल्या फेरीत न आल्यामुळे व प्रवेश यादीमध्ये स्पर्धा असल्यामुळे बाहेरगावी शिक्षणासाठी जाणे याशिवाय विद्यार्थ्यांकडे पर्याय नाही. पहिली यादी संपल्यावरही हजारो विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. तर दुसरीकडे काही महाविद्यालयांच्या अधिकच्या तुकड्यांमध्ये एकही विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरलेला नाही. परिणामी त्या तुकड्यांवर कुलूप लागण्याची वेळ आली आहे.

१७ जुलैला दुसरी व २८ जुलैला तिसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे अकरावीचे शैक्षणिक वर्ग ऑगस्ट महिन्यात सुरू होणार असतील तर प्रश्न उभा राहतो. जे विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित आहेत, त्यांचे पुढील शिक्षणाचे काय? प्रवेश प्रक्रियेचा ढिसाळपणा पाहता अनेकांना प्रवेश मिळणार नाही आणि ते शैक्षणिक वर्ष गमावण्याच्या टोकावर आहेत. अकरावीला सध्या बोर्ड परीक्षा घेतली जात नाही. त्यामुळे पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या वर्गाकडे तडजोडीच्या नजरेने पाहतात. याचे दूरगामी दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम जेईई, सेट, नीट या स्पर्धा परीक्षेच्या तयारी आणि शिक्षणाच्या गंभीरतेवर होतात.

ग्रामीण भागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे पालक शेती, मजुरी आणि रोजंदारी करणारे आहेत. हे पालक आपल्या मुलांनी योग्य शिक्षण घ्यावे व उज्ज्वल भविष्य घडवावे अशी इच्छा बाळगतात. पण त्यांची आर्थिक परिस्थिती शिक्षणाचा खर्च उचलू शकत नाही. विशेषतः जेव्हा स्थानिक महाविद्यालयात प्रवेश न मिळता बाहेरगावी जावे लागते तेव्हा प्रवास, राहण्याची व्यवस्था, भोजन आणि अतिरिक्त फी यांचा आर्थिक भुर्दंड सहन करणे त्यांना अशक्य होते. ग्रामीण भागातील अनेक भागांमध्ये कनिष्ठ महाविद्यालये नसल्यामुळे विद्यार्थ्यांना ३० ते ४० किलोमीटर अंतर प्रवास करावा लागतो. या वयात म्हणजे १६ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांना दररोज प्रवास करणे किंवा दुसऱ्या गावात राहणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. विशेषतः मुलींना हे खूपच त्रासदायक ठरते. शासनाने समान संधी देण्याच्या उद्देशाने डिजिटल व केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया राबवली आहे. यातून शैक्षणिक शुल्क आधारित शिक्षणसंस्था, अवैध प्रवेश वसुली यांना आळा बसला आहे हे जरी स्वागतार्ह असले तरी स्थानिक गरजांशी विसंगत ही प्रणाली ग्रामीण भागासाठी अडथळा ठरते आहे. एकसंध धोरण हे शहरी परिस्थितीपुरते उपयुक्त आहे पण स्थानिक महाविद्यालयांची क्षमता, अभ्यासक्रमाची मागणी आणि वाहतूक सुविधा लक्षात न घेतल्यास ते ग्रामीण विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे ठरते.

शिक्षणात सध्या ७० ते ८० टक्के विद्यार्थी फक्त अभियांत्रिकी, वैद्यकीय, आयआयटी, डिफेन्स याच प्रवेश परीक्षांच्या मागे धावत आहेत. परिणामी अनेक जण कला, वाणिज्य, कृषी, शिक्षणशास्त्र, परंपरागत व्यवसाय या शाखांकडे वळत नाहीत. एकंदरीत शिक्षणपद्धतीचे मेंढीवळण झाले आहे. शासनाने ग्रामीण भागात दहा हजार लोकवस्तीच्या गावात विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांची ओळख करून देणारे मार्गदर्शन केंद्र, सृजनशील अभ्यासक्रम, उद्योजकतेचे शिक्षण सुरू करणे आवश्यक आहे. मागील वर्षांपर्यंत नवीन उदयास आलेल्या अनेक खाजगी संस्था, उत्तीर्णची हमी व गुणांच्या हमीच्या नावाखाली प्रवेश द्यायच्या. यासाठी हजारोंच्या फी आकारली जायची. शासनाच्या हस्तक्षेपामुळे यावर नियंत्रण आले आहे, पण याचा फटका त्यांच्या जागेवर प्रवेश घेऊ शकणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांना बसतो आहे. पूर्वी प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांनी आता अर्जदारांच्या गुणवत्तेच्या टक्केवारीवर भर देणे सुरू केले आहे. शासनाने धोरणात्मक लवचीकता दाखवून, ग्रामीण-शहरी गरजांचे मूल्यमापन करून आणि पालकांच्या आर्थिक क्षमतेचा विचार करून ही प्रवेश प्रक्रिया अधिक समावेशक करणे ही काळाची गरज आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# भारतातील सर्वोत्कृष्ट कंपन्या-२०२५

**दत्तात्रेय आंबुलकर**

सर्वेक्षणाच्या संदर्भात 'ग्रेट प्लेस टू वर्क'द्वारा यावेळी जी पद्धत अंमलात आणली, त्यानुसार संस्थेकडे यासंदर्भात उपलब्ध असणाऱ्या ३० वर्षांचा तपशील व संबंधित माहितीचा उपयोग करण्यात आला. यामध्ये विविध देशांतर्गत व जागतिक पातळीवर अव्वलतेसह काम करणाऱ्या व नावलौकिक कमावणाऱ्या कंपन्यांचे दाखले उपलब्ध झाले. यामध्ये सुमारे १७० देशांमधील सर्वोत्कृष्ट कंपन्यांचा अभ्यास व विश्लेषण करण्याच्या प्रदीर्घ कामाचा समावेश होता, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे.

यावेळच्या 'ग्रेट प्लेस टू वर्क' सर्वेक्षणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, सर्वेक्षणादरम्यान बदलते तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेसह बदलती कार्यपद्धती, व्यवसायाचे वाढते जागतिकीकरण, वेगाने वाढणारी स्पर्धा, नवी व बदलती व्यवस्थापनशैली व या साऱ्या संदर्भातील कर्मचाऱ्यांची क्षमता, कार्यपद्धती व त्यांची मानसिकता या उद्योग-व्यवसायांशी संबंधित महत्त्वपूर्ण बाबींचा विशेष अभ्यास करण्यात आला. याशिवाय या प्रमुख मुद्यांची सांगड कंपनीच्या कार्यसंस्कृतीशी घालून त्याआधारे विभिन्न कंपन्यांचे त्यांच्या अव्वलतेच्या संदर्भात मूल्यांकन करण्यात आले.

सर्वेक्षणात सहभागी होणाऱ्या कंपन्यांचे त्यांचा व्यावसायिक व्याप, व्यवस्थापनाचे स्वरूप, व्यवसाय केंद्रांची व कर्मचाऱ्यांची संख्या इत्यादींच्या आधारे दोन श्रेणींमध्ये विशिष्ट निकषांसह वर्गीकरण करण्यात आले. या निकषांमध्ये संबंधित कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या कौशल्य-पात्रता व क्षमतेवर विशेष भर देण्यात आला. यासाठी संस्थेतर्फे कंपनीची व्यवस्थापकीय क्षमता व तिथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पात्रता याची परस्पर संदर्भात व अधिक परिणामकारक पडताळणी करण्यासाठी सर्वेक्षणातील सर्वाधिक म्हणजेच ७५ गुणांक ठेवण्यात आले होते. या सर्वेक्षण पद्धतीमध्ये कर्मचाऱ्यांना कंपनीच्या व्यवसाय-व्यवस्थापनाच्या संदर्भात जे प्रश्न विचारण्यात आले, त्यांचे प्रतिसाद संगणकीय पद्धतीने व संपूर्णपणे गोपनीय ठेवण्यात आले.

सर्वेक्षणाच्या दुसऱ्या व तेवढ्याच महत्त्वपूर्ण टप्प्यात कंपनी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या संदर्भात कंपनीतील प्रचलित कार्यपद्धती व कामकाजाची पद्धत यांची संवेदनशील पडताळणी करण्यात आली व त्यासाठी सर्वेक्षणांतर्गत २५ गुणांक ठेवण्यात आले होते. या पडताळणीतील गुणांक संबंधित कंपनीच्या अव्वलतेशी निगडित मूल्यांकनाशी जोडण्यात येऊन त्यानुसार सर्वेक्षणात सहभागी झालेल्या कंपन्यांचे श्रेणीनुसार अंतिम मूल्यांकन करण्यात आले. सर्वेक्षण पद्धतीच्या या मुख्य मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे मोठ्या कंपनीगटांतर्गत जे मूल्यांकन करण्यात आले, त्यात कंपन्यांचा कर्मचाऱ्यांशी संबंधित व निगडित मुद्यांवर विशेष भर देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. 'ग्रेट प्लेस टू वर्क' सर्वेक्षणांतर्गत मोठ्या कंपन्यांमधील पहिल्या पाच कंपन्यांच्या मूल्यांकनाशी संबंधित कंपन्यांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसून आली.

'ग्रेट प्लेस टू वर्क' सर्वेक्षणात प्रथम क्रमांक आदरातिथ्य क्षेत्रातील 'हिल्टन' कंपनीला मिळाले आहे. सर्वेक्षणादरम्यान प्रामुख्याने जाणवलेली बाब म्हणजे 'हिल्टन सर्वोपरि' हा उपक्रम. या उपक्रमाची अंमलबजावणी कंपनी व कर्मचाऱ्यांतर्फे सातत्याने केली जात आहे. सर्वेक्षणातील विश्लेषणानुसार, दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या 'सिंक्रोनी इंटरनॅशनल सर्व्हिसेस प्रा. लि.' या कंपनीने आपल्या साऱ्या व्यवसाय-व्यवहारांमध्ये 'पीपल फर्स्ट' हे मार्गदर्शक तत्त्व पुरतेपरी पाळले आहे. 'आय फायनान्स'ने सर्वेक्षण क्रमवारीत तिसरे अव्वल स्थान मिळविले आहे. कंपनीतर्फे जनसामान्यांच्या जीवनात विशेष सकारात्मक बदल घडविण्यावर भर दिला जातो. याच अनुषंगाने कंपनीच्या कर्मचाऱ्यांना आपुलकीची व आपलेपणाची वागणूक देण्यावर भर दिला जातो. 'माल हाताळणी व वाहतूक क्षेत्रात प्रदीर्घ कालावधीपासून काम करणाऱ्या डीएचएल एक्सप्रेस इंडिया' कंपनीचे यावर्षीच्या 'ग्रेट प्लेस' नामावलीतील चौथे स्थान प्राप्त केले आहे. कंपनीच्या धोरणात्मक कार्यसंस्कृतीमध्ये 'परस्पर आदर, परिणामकारक काम व कामाच्या संदर्भात सर्वंकष जबाबदारी' या बाबी कंपनी कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपात बिंबविल्या जातात. सर्वेक्षणातील पाचव्या स्थानी पण आदरातिथ्य क्षेत्रातील प्रमुख अशा आयटीसी हॉटेल्स समूह ही कंपनी राहिली आहे. कंपनीच्या व्यावसायिक धोरणात्मक निर्णयानुसार व्यवसायांतर्गत सार्वत्रिक व्यवसाय-वाद या मुद्यांवर विशेष भर दिला जात आहे. अशा प्रकारे उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील कामकाज, कार्यसंस्कृती व कर्मचाऱ्यांची मानसिकता इत्यादी बाबी यानिमित्ताने नवे स्वरूप व संदर्भासह स्पष्ट झाले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

आज देशातील न्यायालयात घटस्फोटाच्या लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडत आहे. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते. आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटांची कारणे पाहिली तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई-वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत. कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवा. नाते कोणतेही असो, त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो. मात्र शब्दाला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्हीकडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच. अशा तेल ओतणाऱ्या व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वांत महत्त्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येते. म्हणून पती-पत्नीमध्ये विश्वास खूप महत्त्वाचा आहे. विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे पती-पत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात, म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

● ● ● ●

### प्रशासनाचे दुर्लक्ष

लक्ष्मीनगर आठ रस्ता चौक नुसता फिरते विक्रेत्यांनी व्यापून गेला आहे. तसेच रहदारीचा खूप त्रास आहे. चौकातून इकडे तिकडे जायचे असेल तर मोठे जिकरीचे काम असते. चौकात एक मोठा मॉल असून, त्याची पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहने अस्ताव्यस्त लागलेली असतात. त्यामुळे सर्वसामान्यांना खूप त्रास होतो आहे. प्रशासनाने यावर कायम तोडगा काढावा, या अपेक्षेत.

**विजय भास्कर देशपांडे**/९०९६६५९४७०

● ● ● ●

### तरुण भारतच्या 'साहित्य-संस्कृती'ने जोडली नाती

दैनिक तरुण भारतच्या साहित्य-संस्कृती या पानाचा मी नियमित वाचक आहे. गेल्या काही महिन्यांपासून या पानावर लिखाणही करतोय. माझे असेच एक लिखाण ८ जुलै २०२५ च्या साहित्य-संस्कृती या विशेष पुरवणीमधून प्रसिद्ध झाले. विविधतेने नटलेली वैदर्भीय खवय्येगिरी हा लेखनाचा विषय होता. नागपूरच्या एका ८२ वर्षीय आजीने माझा लेख वाचला व त्यावर प्रतिक्रिया देण्याकरिता मला फोन केला. सुरुवातीला परिचय देऊन झाल्यावर त्यांनी माझ्या लिखाणाचे कौतुक केले. आपली खाद्यसंस्कृती किती श्रेष्ठ आहे हे त्यांनी त्यांच्या आजवरच्या अनुभवावरून सांगितले. अनेक खाद्यपदार्थ, जी मी यापूर्वी कधीही ऐकली नव्हती, ती त्यांनी सांगितली. आणि याच खाद्यसंस्कृतीमुळे वयाच्या ८२ व्या वर्षी सुद्धा रामनामाच्या गोळीशिवाय इतर कुठलीही गोळी नसल्याचे त्या आजीने अभिमानाने सांगितले. पिझ्झा, बर्गरच्या आजच्या खाद्यसंस्कृतीत तुमची पिढी आपल्या मूळ खाद्यसंस्कृतीवर लिखाण करते हे त्या आजीला खूप आवडले. संवादाच्या शेवटी माय-लेकाचे नाते जोडून त्यांच्या हातची कांदाभजी खायला नागपूरला घरी यावे म्हणून निमंत्रणही दिले.

सांगायचा भाग म्हणजे दैनिक तरुण भारतचा वाचकवर्ग सुजाण आहे, अभ्यासू आहे. आपल्या संस्कृतीवर प्रेम करणारा आहे. तरुण भारत हे केवळ नफा कमावणारे वृत्तपत्र नाही तर तो एक विचार आहे. आपली संस्कृती रुजवण्याचा, जोडण्याचा...

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शाळा, महाविद्यालय परिसरातील पानटपऱ्या हटविण्याची मोहीम

## नगर पालिका प्रशासन आणि पोलिसांची संयुक्त कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

शाळा व महाविद्यालयपासून १०० मीटरच्या आत असलेल्या पानटपऱ्या हटविण्याची मोहीम मंगळवार दि १५ जुलै रोजी नगर पालिका आणि शहर पोलिस यांनी संयुक्तपणे केली असून ही कारवाई सतत चालून ठेवण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी सांगितले.

शाळा व महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर पानटपऱ्या धारकांनी अतिक्रमण केले आहे. या पानटपऱ्यामधून प्रतिबंधीत असलेल्या तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ, विविध प्रकारच्या पुड्या तसेच पान मसाला विक्री करीत आहेत. शालेय व महाविद्यालयीन अल्पवयीन विद्यार्थी या तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करत असतांना दिसत आहेत. शासनाचे आदेशानंतरही पान टपरी धारक सर्रासपणे विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ विक्री करीत असतांना दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून त्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. या अनुषंगाने नगर पालिका प्रशासनाने शहर पोलिसांच्या मदतीने शहरातील सरस्वती विद्या मंदिर, भारतीय विद्या मंदिर, जिल्हा परिषद बहुविध प्रशाला, सरजुदेवी भिकुलाल भारूका, माणिक स्मारक आर्य विद्यालय तसेच इतर शाळा व महाविद्यालयाच्या १० मीटरच्या आत असलेल्या पान टपऱ्यांची तपासणी केली. यावेळी पान टपरीमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणावर आढळले आहेत. पथकांनी हे पदार्थ जप्त करून पानटपऱ्या हटविल्या तसेच पानटपऱ्या नगर पालिकेने ट्रॅक्टरमध्ये टाकून जप्त केल्या आहेत. तसेच अतिक्रमण करणाऱ्यांवर देखील यावेळी कारवाई करण्यात आली आहे.

सदरील कारवाई मुख्याधिकारी अरविंद मुंडे, पोलिस निरीक्षक संदीप मोदे, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, साबळे, नगर अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह नगर पालिका आणि पोलिस कर्मचारी यांनी केली आहे. सदरील कारवाई सुरूच राहणार असून शाळा, महाविद्यालय परिसरात पानटपरीमध्ये तंबाखूजन्य पदार्थ आढळल्यास ५ हजार रूपये दंड आकारण्यात येणार असून पालकांनीही या मोहीमेत साथ द्यावी तसेच पाल्यांना तंबाखूजन्य पदार्थ न खाण्याचे सांगावे असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी केले आहे.

# उद्योजकांना सर्व परवानग्या तत्काळ उपलब्ध करून द्या– गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**



जिल्हा औद्योगिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व परवानग्या तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जिल्हा सल्लागार समिती, जिल्हास्तरीय स्थानिक लोकांना रोजगार समिती, आजारी उद्योग पुनरुज्जीवन जिल्हास्तरीय समिती, जिल्हा निर्यात प्रचलन समिती आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम जिल्हा कार्यबल समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्रीय अधिकारी आर. एच. शिंदे, उप अभियंता अरुण पवार, अनिल चव्हाण, जिल्हा उद्योग केंद्राच्या उद्योग निरीक्षक सुदेशना सवराते, जिल्हा औद्योगिक संघटनेचे रमेश पंडित, नितीन राठोड, संतोष चौधरी यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक उपस्थित होते.

जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी व वसमत औद्योगिक क्षेत्रामधील भूखंड संपले असून, अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र वाढविणे, यात वारंगा, दाभाडी, कुर्तडी, चुंचा मनाठा व वरवंटा येथे प्रस्तावित ड्रायपोर्ट व एमएमएलपीसाठी संपादित क्षेत्र चौंडी तर्फे सेंदुरसेना येथे घेण्याबाबत तसेच सेनगाव व औंढा तालुक्यामध्ये औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करावी. उद्योजकांना लागणाऱ्या सर्व परवानग्या तात्काळ देण्याबाबत कार्यवाही करावी. हिंगोली औद्योगिक क्षेत्रातील पाणीटंचाई दूर करण्याचे काम सुरू आहे. त्याबाबत संबंधित विभागाने जलशुद्धीकरण केंद्र आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला. औद्योगिक क्षेत्रात पाणीवापर धोरण बदलाबाबत निर्णय घेताना तसे बदल शासनाकडे सुचविण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

हिंगोली शहराजवळ भूखंड मिळाल्यास अतिरिक्त औद्योगिक वसाहत स्थापन करुन ती वेगाने विकसित होऊ शकेल. त्यामुळे शहराजवळ जमीन मिळविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करावेत, अशा सूचना उद्योजकांनी यावेळी उद्योग विभागाला केल्या. एमआयडीसी समोरील औंढा रोडवरील अतिक्रमण काढावे. तसेच या क्षेत्रातील ड्रेनेज लाईन, पथदिवे बसवणे, वीजपुरवठा सुरळीत करावेत, औद्योगिक क्षेत्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस सुरक्षा ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

# आठवी शिष्यवृती परिक्षेत शांताबाई दराडे विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**



भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची भविष्यातील एमपीएससी व यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांची तयारी होते. विद्यालयाचे एकूण सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांच्यामार्फत या परीक्षेचे आयोजन केले जाते. हनुमान गजानन जाधव, कनिष्का अरुण चोंढेकर, राधिका राजेश अंभोरे, सृष्टी हरिदास वायचाळ, कृष्णा किशोर पडोळे, शुभम विजय पडोळे हे विद्यार्थी शिष्यवृतीसाठी पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांना विनोद शिंदे, संगीता जाधव, प्रवीण राऊत व जागृती गोरे या अध्यापकांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक अध्यापकांचे व पालकांचे शाळेच्या व संस्थेच्यावतीने मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांनी सत्कार केले. याप्रसंगी ज्येष्ठ अध्यापक दत्तराज डोईफोडे, अनिल लोळेवार व राम शेट्टे यांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व सन्माननीय संचालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचे अभिनंदन केले.



**हिंगोली– वेतन त्रुटी दूर करणे, सेवा प्रवेश नियम, प्रशासकीय बदली, कंत्राटीकरण रद्द करणे, १०० टक्के पदनिर्मिती, केंद्र शासनाप्रमाणे भत्ता देणे, पदनामात बदल करावा आदी मागण्यांसाठी मंगळवारी जिल्हा सामान्य रूग्णालयातील परिसेविका आणि अधिपरिचारीका यांच्यावतीने काळ्या फिती लावून काम करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने अधिपरिचारीकांनी सहभाग घेतला. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### गोरेगाव व परिसरातील वीजपुरठा सुरळीत करा

हिंगोली– गोरेगाव येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या गलथान कारभाराविरोधात गोरेगाव परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. गोरेगावकरांच्या व परिसरातील एकूण २६ गावच्या नागरिकांनी या मागण्यांना पाठींबा दिला आहे. मागण्यांमध्ये गोरेगाव ३३ के व्ही अंतर्गत एकूण २६ गाव येतात त्यामध्ये गोरेगाव एक व गोरेगाव दोन यासाठी कनिष्ठ अभियंत्याची नियुक्ती करावी, गोरेगाव व परिसरातील वारंवार जाणारा विद्युत पुरवठा सुरळीत करावा, गोरेगाव ३३ के व्ही अंतर्गत लाईन स्टाफ लाईनमन आउटसोर्सिंगचे जेवढे मान्य पदे आहेत ते लवकरात लवकर भरावीत, गोरेगाव गावठाण फिडर लवकरात लवकर वेगळे करावे आदी मागण्यांचा समावेश आहे. दि ३१ जुलै पर्यंत मागण्या पूर्ण न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### नर्सी नामदेव येथे मोफत आरोग्य शिबीर

हिंगोली– परत वारी एकादशीनिमित्त दिनांक २१ जुलै रोजी नरसी नामदेव येथे भव्य मोफत आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. शिबिरा मध्ये पोटाचे आजार निदान उपचार, सर्व मूत्र रोगासंबंधी किडनी स्टोन प्रोस्टेट निदान व उपचार सर्व प्रकारच्या हाडाचे आजार,यांच्या वर निदान व उपचार सांधे दुखी पाठ दुखी मान दुखी कंबर दुखी यावर उपचार, फॅक्चर निदान आणि उपचार. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत हाडाच्या आजारावर मोफत उपचार व सुविधा उपलब्ध राहणार आहे. यासाठी नियम व अटी राशन कार्ड आधार कार्ड आयुष्यमान कार्ड सोबत आणावे. अशी माहिती डॉ. शुभम विठ्ठलराव रोडगे, डॉ. विठ्ठल रोडगे यांनी दिली.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर

हिंगोली– जिल्ह्यातील हिंगोली जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणांच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार सोमवार, १४ जुलै २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, तहसील कार्यालये आणि पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना असल्यास, त्या २१ जुलै २०२५ या कालावधीत हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्रामपंचायत निवडणूक शाखेत सादर करता येतील. सर्व संबंधितांनी प्रारूप प्रभाग रचनेचे अवलोकन करून हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

### ५ जुगार अड्ड्यावर पोलिसांच्या धाडी

हिंगोली– जुगार कायद्यांतर्गत जिल्ह्यात पोलिसांनी ५ ठिकाणी छापे मारले यावेळी ३४ हजार ४५० किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत तर अवैध वाहतुक करणारे व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१ वाहनचालकाविरूध्द कारवाई करीत २४७५० दंड वसूल करण्यात आला आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची भाटेगाव येथील मत्स्यबीज उत्पादन केंद्राला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**



जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी व जिल्ह्याचे मत्स्य उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कळमनुरी तालुक्यातील भाटेगाव येथील मत्स्यबीज उत्पादन केंद्राला नुकतीच भेट दिली.

या भेटी दरम्यान जिल्हाधिकारी महोदयांना जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाच्या उपलब्ध संसाधनांबाबत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, हिंगोली श्रावण व्यवहारे यांनी अवगत करुन दिले व जिल्ह्यातील मत्स्यउत्पादन वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे सभासद संदेश ढेंबरे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या अडचणीबाबत व मत्स्यव्यवसायाबाबत जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी विचारणा केली. तसेच चालू प्रमुख कार्प प्रजनन हंगाम व मत्स्य उत्पादन वाढीसाठी मत्स्यबीज उत्पादन केंद्राचे महत्व याबाबत माहिती देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मत्स्यबीज उत्पादन केंद्राची सुधारणा व आधुनिकीकरण करण्याकरिता आवश्यक निधी भविष्यात उपलब्ध करुन देऊ, असे जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. या भेटी दरम्यान मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रावण व्यवहारे, प्रेमदास राठोड व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# आदर्श महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात १५९ उमेदवारांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर व आदर्श महाविद्यालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच येथील आदर्श महाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर या पात्रतेच्या ३१५ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५९ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते.

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास आघाव यांनी चांगल्या ठिकाणी आत्मविश्वासाने मुलाखत द्यावी व आपल्यातल्या सुप्त गुणांना वाव द्यावा, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त बालाजी मरे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले, आज उमेदवारांना भलेही कमी पगाराची नोकरी मिळेल पण सर्व युवकांनी मिळेल ती संधी स्वीकारली पाहिजे. या संधीतून मिळालेल्या कामाचा अनुभव पुढील संधीसाठी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे युवकांनी मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवून रोजगार प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर शिंदे यांनी व आभार नवनाथ टोनपे यांनी केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे राजाभाऊ कदम, नागेश निरदुडे, रमेश जाधव, पवन पांडे, प्रवीण राठोड, अभिजीत अलोने आणि आदर्श महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. आशिष गट्टानी, डॉ.लक्ष्मण सोळंके, डॉ.माधव बळवंते, बंडू ठाकूर, संजय राठोड, धम्मपाल इंगोले, सुदर्शन निजलेवार व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# ७१ जणांनी केले येळी फाटा शिबीरात रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

औंढा तालुक्यातील येळी फाटा येथे रक्तदान शिबिर मंगळवार (दि.१५) जुलै रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात आले.या शिबिरास राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बी डी बांगर,राकाँ तालुकाध्यक्ष संजय दराडे, राकाँ तालुकाध्यक्ष जिंतूर लक्ष्मणराव बुधवंत, आमदार चंद्रकांत नवघरे यांचे बंधू उमाकांत नवघरे, राष्ट्रवादी ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख उपस्थित होते. या रक्तदान शिबिरामध्ये ७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शाळेच्या प्रांगणात १०१ वृक्षाचे वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रकट दिनानिमित्त या रक्तदान शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे विलास आघाव, जगन्नाथ सांगळे, अमोल गीते, गजानन सांगळे, सुभाष कावरे, जयराम कुटे, सागर घनसावंत, शेषराव सांगळे, संदीप मुंडे, पुरुषोत्तम झाडे, राजू नागरे, ऋषिकेश सानप गजानन सांगळे, भैया पाटील, भगवानराव ईघारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबिर व वृक्षारोपण या कार्यक्रमाचे आयोजन विलास आघाव, जगन्नाथ सांगळे, अमोल गीते यांनी केले होते.

# ६ ऑगस्टला पार्थिव शिवलिंग पूजनाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**



श्रावण मासामध्ये बुधवार दि.६ ऑगस्ट रोजी पार्थिव शिवलिंग पुजनाचा भव्य कार्यक्रम आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती व श्री सद्गुरु सेवा प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची पुर्व तयारी आढावा बैठक रविवारी संपन्न झाली.

हिंगोली येथील छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसर एनटीसी येथे श्रावण मासात बुधवार दि.६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता आई जगदंबा नवरात्र महोत्सव समिती व श्री सद्गुरु सेवा प्रतिष्ठाण हिंगोली यांच्या वतीने पार्थिव शिवलिंग पुजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची पुर्व तयारी बैठक उद्यान परिसरात रविवार दि.१३ जुलै रोजी संपन्न झाली. या बैठकीला आयोजक लक्ष्मीकांत पाठक महाराज, धोंडीराज पाठक गुरु, प्रसाद पाठक गुरु, आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीचे कल्याण देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. पावसाळ्याचे दिवस आल्यामुळे कार्यक्रम स्थळी उद्यान परिसरात कापडी मंडप, महाप्रसाद व मुख्य आयोजना विषयी माहिती देण्यात आली. पार्थिव शिवलिंग पुजन निःशुल्क असुन भाविकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रचार, प्रसार, प्रसिद्धी पत्रके वितरण, पुजा विधी साहित्य या विषयी माहिती देण्यात आली. या बैठकीला संयोजन समितीतील वंदनाताई भुंसाडे, अनिताताई शिंदे, ज्योतीताई कान्हे, कविताताई मद्दीलवार, योगिताताई कान्हे, कावेरीताई रोडगे, योगिताताई देशमुख, कुंजनाताई टाक, राधाताई बियाणी, छायाताई मगर, योगिताताई जोशी, कु.सपना राऊत, कु.वैष्णवी खेत्रे, कु.सायली इंगळे, कु.अंकिता पवार, कु. शितल झाडे, कु.श्रद्धा चौतमल, कु.प्रियल देशमुख, कु.साक्षी दवणे, कु.श्रृती देशपांडे, दिपाताई भक्कड, राखीताई झंवर, दिपालीताई घन, स्वातीताई जोशी, संध्याताई देशमुख, सविताताई चक्रवार, संगिताताई मामडे, शिल्पाताई नर्सीकर, दिपालीताई पोहेकर-घन, शैलजाताई सौंदणकर यांच्यासह महिलांची उपस्थिती होती.



बीड जिल्ह्यात सध्या पावसाने उघडीत दिल्याने वन्य प्राण्याकडून पिकाची नासाडी होत आहे यासाठी शेतकऱ्यांनी शेतामध्ये अशी बुजगावणे केले आहेत (छाया कृष्णा शिंदे)

# बळी गवते, बी.बी.जाधव यांनी आर्थिक गैरव्यवहार केला नारायणगडाचे महंत शिवाजी महाराज यांचे घणाघाती आरोप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जुलै**

श्री क्षेत्र नारायणगड चे ट्रस्टी बळीराम बबन गवते आणि बी बी जाधव या दोघांनी गडाची विनाकारण बदनामी केली. पंचवीस कोटी रुपयांची कामे त्यांना करून गुत्तेदारी करायची होती. गडाच्या अनेक जागा त्यांनी विकून आर्थिक गैरव्यावहार केल्याचा खळबळजनक आरोप गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी केला.

बीड तालुक्यातील नारायणगडाचा वाद गेल्या काही दिवसापासून सुरु आहार. गडाचे वारस म्हणून शिवाजी महाराज यांनी भाचे संभाजी महाराज यांची नियुक्ती केल्यानंतर वादाला सुरवात झाली.

गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी पत्रकार परिषद घेऊन गडावर दबाव आणण्याचा प्रयत्न जाधव आणि गवते यांनी केला असं म्हटलं. स्व विनायक मेटे यांनी गडासाठी राज्य सरकारकडून पंचवीस कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. हे कामं गवते आणि जाधव यांना करायचे होते. मात्र ते न मिळाल्याने त्यांनी गडाची बदनामी केली.

२०१२ मध्ये बळीराम गवते यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी निधी गोळा करण्यासाठी सुरवात केली, मात्र त्या निधीचा वापर स्वत:साठी केला. असा आरोप महाराजांनी केला.

गडावर दबाव आणणाऱ्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी यापुढे शंभर मुलांची टीम तयार असेल असा इशारा सुद्धा त्यांनी दिला.

## दिव्यांग, जेष्ठांना मिळणार कृत्रिम साहित्य; शिबीराचा लाभ घ्या

### खा.बजरंग सोनवणे यांचे अवाहन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ जुलै**

बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१८ ते ३०जुलै २०२५ या कालावधीमध्ये पूर्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबीरात दिव्यांग, जेष्ठांनी लाभ घ्यावा, असे अवाहन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर, काठया, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटपाच्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या-त्या तालुक्यातील पंचायतसमिती मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील केज येथे सदर शिबीराचे उद्घाटन दि.१८ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा मतदार संघ यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. तालुकास्तरावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शिबीर असेल, अशी माहिती एस.एन.मेश्राम-जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी दिली आहे. दरम्यान, या शिबीरात साहित्याचा लाभ घ्यावा, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

आवश्यक कागदपत्रे

दिव्याग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत, व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे. अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.

शिबीराबाबत अधिक माहिती

तालुका दिनांक ठिकाण
केज १८ जुलै पंचायत समिती, अंबाजोगाई १९ जुलै पंचायत समिती, बीड २१ जुलै पंचायत समिती
माजलगाव २२ जुलै पंचायत समिती
पाटोदा २३ जुलै पंचायत समिती
वडवणी २४ जुलै पंचायत समिती
आष्टी २५ जुलै पंचायत समिती
धारूर २६ जुलै पंचायत समिती
परळी २८ जुलै पंचायत समिती
शिरूर २९ जुलै पंचायत समिती
गेवराई ३० जुलै पंचायत समिती

## लोकजागृती आणि लोकशिक्षणातून समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न करू-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जुलै**

सध्या समाजाला चांगल्या कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या मुद्द्यांवर लोकशिक्षण आणि लोक जागृती करणे आवश्यक आहे. संघटन असल्याशिवाय जनतेचे लहान लहान प्रश्न सुटत नाहीत. आणि त्यांना मार्गदर्शन होत नाही. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेची स्थापना केली असून या माध्यमातून आपण जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे प्रतिपादन स्वराज्य जन जागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

स्वराज्य जनजागृती परिषदेची आज रांजणगाव येथे विश्वस्त मंडळाची पहिली सभा पार पडली. या सभेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शेतकरी विद्यार्थी आणि कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न सध्या भेडसावत आहेत. या सर्व प्रश्नांवर एकत्रित येऊन चर्चा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये काम करण्याची क्षमता आहे. त्यामुळे असे सर्व कार्यकर्ते परिषदेच्या माध्यमातून एकत्र करून



समाजाला दिशा देण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. नवी पिढी आदर्श घेईल असे काम परिषदेच्या माध्यमातून झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये लवकरात लवकर पोहोचण्यासाठी यावेळी चर्चा करण्यात आली. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांपर्यंत कसे पोहोचता येईल, यावर काही निर्णय घेण्यात आले.

परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप, सातारा यांनी आपले विचार मांडताना म्हंटले की, परिषदेत काम करण्यासाठी चारित्र्यसंपन्न लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जास्तीत जास्त तरुणांचा समावेश करून घेण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित करावे. त्याचप्रमाणे संघटन मोठे होण्यासाठी योग्य निर्णय घ्यावे लागतील.

परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर, पुणे यांनी परिषद केवळ महाराष्ट्रात नाही तर महाराष्ट्राच्या बाहेर देखील मोठ्या प्रमाणात काम उभे करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शेतकरी आणि कामगारांच्या मुद्द्या बरोबरच लोकजागृतीच्या मुद्द्यावर देखील त्यांनी आपले मत स्पष्ट केले.शिक्षण व्यवस्थेमध्ये गाव पातळी करून पासून सुधारणा व्हावी, म्हणून शाळांकडे लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा गावातच मिळून देण्यासाठी सक्रिय राहावे लागेल, असे प्रतिपादन परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केले. तर सर्वच काम करत असताना कार्यकर्त्यांनी दक्ष राहून शक्य तेवढा वेळ देऊन काम करण्याची गरज असल्याचे परिषदेचे विश्वस्त गोवर्धन मस्के आणि विष्णू ढवळे यांनी म्हटले. मा. अण्णा हजारे यांनी परिषदेला दिलेला शुभेच्छा संदेश गोवर्धन मस्के यांनी वाचून दाखवला.

आजच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी बैठकीतील सर्व मुद्द्यांवर सक्रिय सहभाग नोंदवत चर्चेत भाग घेतला. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून संघटन वाढीसाठी काय करता येईल, यावर विचार मंथन देखील करण्यात आले. श्रीक्षेत्र रांजणगाव (गणपतीचे)येथील ग्रामपंचायत सभागृहात पार पडलेल्या या बैठकीचे सूत्रसंचालन गोवर्धन मस्के यांनी केले. तर आभार प्रदर्शन शिवाजी खेडकर यांनी केले.

## दिव्यांग बांधवांनी मानले अमरसिंह पंडित यांचे आभार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ जुलै**

गेवराई शहरातील दिव्यांग बांधवांच्या मागण्यांबाबत अमरसिंह पंडित आणि आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष घातल्यामुळे गेवराई नगर परिषदे कडुन शहरातील नोंदणीकृत २८७ दिव्यांग बांधवांना प्रत्येकी दोन हजार रुपये प्रमाणे ५.७४ लक्ष रुपयांच्या निधी वाटपास मान्यता मिळाली आहे. प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष राजु शेख व त्यांच्या सहकाऱ्यांनी या बाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. दिव्यांग बांधवांच्या हक्काच्या निधी वाटपास मान्यता मिळवुन दिल्या बद्दल राजु शेख व त्यांच्या सहकाऱ्यांनी अमरसिंह पंडित यांचा सत्कार करुन त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. नगर परिषेदेतील आजवरच्या तथाकथित सत्ताधाऱ्यांनी सन २०१६ पासुन २०२४ पर्यंतचा निधी दिव्यांगांना मिळु दिला नसल्याची तक्रार यावेळी दिव्यांग बांधवांनी केली. सन २०१६ पासुन थकीत असलेला दिव्यांग निधी वाटपातही लक्ष घालणार असल्याचे आश्वासन अमरसिंह पंडित यांनी यावेळी दिले.

## लिंबागणेश येथे उभारला जाणार १०१ फूट उंच भगवा ध्वज



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जुलै**

बीड तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान परिसरात १०१ फूट उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. हिंदू संस्कृती, परंपरा व त्यागाचे प्रतीक असलेल्या या भगव्या ध्वजाच्या स्थापनेसाठी १४ जुलै रोजी सोमवारी सकाळी भूमिपूजनाने शुभारंभ करण्यात आला. या ऐतिहासिक क्षणी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भक्तगण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वज स्थापनेमागील उद्देश आणि प्रेरणा

भगवा ध्वज म्हणजे केवळ कापड नव्हे, तर हिंदू धर्माची शौर्यपर परंपरा, एकता, त्याग आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक मानला जातो. या ध्वजामुळे लिंबागणेशची धार्मिक ओळख अधिक दृढ होणार असून, भालचंद्र गणपती मंदिराला नव्या आध्यात्मिक उंचीवर नेण्याचा ग्रामस्थांचा संकल्प आहे.

# देवगिरी प्रतिष्ठानतर्फे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

### राज्यभरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जुलै**

देवगिरी प्रतिष्ठाण, बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले असून, यंदाचे हे १६ वे वर्ष आहे. ही स्पर्धा रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे.

या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शालेय इ.८वी ते १२वी कनिष्ठ आणि महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर वरिष्ठ असे दोन गट असतील. वरिष्ठ गटासाठी विषय संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे मार्गदर्शन व योगदान, अण्णाभाऊ साठे यांची आंबेडकर वादाबाबत भूमिका आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद हे असून कनिष्ठ गटासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवी कल्याणाचे मार्गदर्शक आहे काय?, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील नायक-नायिका समता- स्वातंत्र्य-बंधुत्व न्यायासाठी लढतात काय? आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन फकीरा या कादंबरीतून अण्णाभाऊंनी दर्शविले आहे हे विषय निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक स्पर्धकास ५ ते ७ मिनिटांचा वेळ दिला जाणार असून, भाषाशैली, विषयाची सखोलता, प्रभावी मांडणी आणि सादरीकरण या निकषांवर मूल्यांकन करण्यात येणार आहे.



शालेय गटासाठी प्रवेश शुल्क ५०/- आणि महाविद्यालयीन गटासाठी १००/- निश्चित करण्यात आले आहे. सहभागी स्पर्धक आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या शिक्षकांसाठी भोजनाची विनामूल्य व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.या स्पर्धेसाठी वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटांमध्ये पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक १०,०००, द्वितीय ७,०००, तृतीय ५,००० तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० आणि सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक ७,०००, द्वितीय ५,०००, तृतीय ३,००० आणि तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपली नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज स्कॅन करून ऑनलाइन फॉर्मद्वारे नोंदणी करता येईल. बीड, धाराशीव, नांदेड, परभणी, संभाजीनगर, लातूर आदी जिल्ह्यांतील शिक्षक समन्वयकांमार्फतही ही नोंदणी प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ७०३०००८५६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणार!

## जालना विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक घरकुलांना मंजुरी -आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जालना विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे एकूण १२ हजार २०७ घरकुलांना मंजुरी मिळविली आहे. मागील दोन वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली असून घरकुलांचा निधी लाभार्थींच्या थेट खात्यावर वितरितही झाला आहे. बेघर तसेच कच्ची घरी असलेल्या सर्वसामान्य कुटुंबासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुलांना मंजुरी आणल्याचा मला विशेष आनंद आणि समाधान असल्याचे माजी राज्यमंत्री, आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

आमदार खोतकर यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हेच आपले ध्येय आहे. जालना शहरात सुमारे ३०० कोटींची कामे सुरू आहेत. रस्ते, नाल्या, सभागृह, संरक्षण भिंत,चौक आणि ओपन स्पेस सुशोभीकरण अशा विविध प्रकारच्या कामांचा त्यात समावेश आहे. देवी, गणपती, छटपूजा अशा मूर्ती विसर्जनासाठी मोती तलाव येथे (संभाजी तलाव) ११ कोटी रुपये खर्चून विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. अंबड येथील फिल्टर प्लांटचे तसेच शहरातील पाण्याच्या टाक्यांचे काम प्रगतीपथावर आहे. सौर ऊर्जा प्रकल्पही (घाणेवाडी तलावनजीक) लवकरच कार्यान्वित होईल. आणि दिवाळीनंतर जालनेकरांना दररोज अथवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे स्वप्नदेखील होणार आहे.



घरकुलांचे स्वप्न पूर्ण माझ्या जालना विधानसभा मतदारसंघातील ६२ गावांमध्ये एकूण बारा हजार २०७ घरकुलांना आपण मंजुरी मिळविली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत ६० टक्के आणि राज्य पुरस्कृत ४०% अशा स्वरूपात आहे. मंजूर घरकुलांमध्ये ८८२५ केंद्रपुरस्कृत आणि ३३८२ राज्य पुरस्कृत आहेत. २०२४ २५ आणि २५ २६ या वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली आहेत. मंजूर घरकुलांची कामेही प्रगतीपथावर आहेत. आपण निवडणुकीत घरकुलांचा शब्द दिला होता.

बेघर आणि गोरगरिबांसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुले मंजूर करून आणल्याचे समाधान आणि विशेष आनंद वाटतो असेही आमदार खोतकर यांनी आवर्जून म्हटले आहे. आपल्या कारकिर्दीत जालना शहर आणि ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदललेला दिसेल. निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणे याच ध्येयाने आपण अहोरात्र कामाला लागलो असल्याचे आमदार खोतकर यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक वार्डात सुरू असलेल्या विकास कामांमुळे नागरिकांतूनही आपल्याला समाधानकारक प्रतिक्रिया ऐकायला मिळत आहेत.



## वादळी वाऱ्यात शेतकऱ्याच्या सौर पाट्याचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील कावजवळा येथील शेतकरी गंगाबाई शेषराव भांडवलकर यांच्या गट नं २२ वादळी वा-याने सदरील शेतकऱ्याच्या शेतातील सौर कृषी पंपाच्या सौर पाट्याचे वादळी वाऱ्यात झाड्यांच्या फांद्या पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सदर शेतकरी भांडवलकर यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी होत आहे.

भांडवलकर यांच्या शेतातील सौर कृषी पंपाच नंबर MK4413100078248 हा असून उठ्ख कंपनीचा सौर पंप बसवण्यात आलेला होता. सदरील पंपाचे नुकसान झाले आहे. गंगाबाई शेषराव भांडवलकर यांच्या शेतातील सौर उर्जा पाट्याचे वाऱ्या मुळे झाडाची फांदी तुटून पडल्या मुळे महिला शेतकऱ्याचे नुकसान त्याचा पंचनामा करून त्याचा नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## ७२ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर- अनेकांचा स्वप्नभंग



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यांतील ग्रामपंचायतिची आरक्षण सोडत दिनांक १४जुलै रोजी जाहीर करण्यात आली आहे सरपंच पदाचे स्वप्न पहात गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या अनेकांचा आरक्षण जाहीर जाहीर झाल्यानंतर हिरमोड झाला राजकीय राजनितिवर पाणी फेरल्या गेले.मात्र काही जणांचे मनासारखे आरक्षण निघाल्याने त्यांच्या साठी हे आरक्षण सोण्यहून पिवळे ठरले. थेट जनतेतून सरपंच जात असल्याने इच्छुकांनी तैयारी चालवली होती व संपर्क ही वाढवला होता त्यामुळे काय आरक्षण निघते, याकडे गावागावाचे लक्ष लागले होते. जाफराबाद तालुक्यांतील ७२ सरपंच पदाचे आरक्षण जाफराबाद तालुक्यांतील ७२ सरपंच व महिला सरपंच पदाचे आरक्षण उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, तहसीलदार सारिका भगत, नायब तहसीलदार गणेश मिसाळ, मंगेश साबळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत आरक्षण जाहीर करण्यात आले.

यावेळी संजय खांडेभराड, सतिश वाघ, गौतम गवई, यांच्या सह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते उपस्थित होते. सुशांत अनिल चुंगडा या लहान मुलांच्या हाताने चिठ काढण्यात आली,ज्यामध्ये सर्वसाधारण सरपंच पदाचे आरक्षण ग्रामपंचायत हिवराबळी, कोनड बु. ,जानेफळ, अकोला देव ,आसई ,दहिगाव, पापळ,पोखरी ,विरखेडा भालकी, टाकळी ,सावंगी ,वरुड खुर्द, हनुमंत खेडा,निवडुंगा ,घाणखेडा, कुंभारी, कुंभारझरी ,आरतखेडा तर सर्वसाधारण महिला सरपंच पदाच्या आरक्षण असलेल्या ग्रामपंचायती कोल्हापूर ,सिंधी, डोणगाव ,नळविहीरा ,सावरखेडा गोंधन, सातेफळ ,भराडखेडा, खापरखेडा ,बुटखेडा ,वरखेडा वीरो ,काळेगाव ,बोरगाव बु., चापनेर, देऊळझरी, देऊळगाव उगले ,बेलोरा, मंगरूळ,तर नागरिकाचा मागास प्रवर्ग ज्यामध्ये आळंद, सांजोळ, पासोडी, वरुड बुद्रुक ,शिराळा, तपोवन ,सावरगाव मस्के, येवता, टेंभुर्णी,तर नागरिकाचा मागास प्रवर्ग महिला साठी असलेल्या ग्रामपंचायती यामध्ये डावरगाव, पिंपळगावकड,नांदखेडा ,ब्रह्मपुरी ,वानखेडा,देवळेगव्हाण, जवखेडा , माहोरा, भारज बु ,भातोडी,तर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सरपंच पदाच्या आरक्षण ज्यामध्ये मेरखेडा ,सोनगिरी, आडा, तोंडोळी ,म्हसरूळ, चिंचखेडा ,भारजखुर्द,तर अनुसूचित जाती महिला प्रवर्ग ज्यामध्ये खासगाव, गोंधनखेडा, हिवराकाबली, डोलखेडा खुर्द, आंबेगाव, खानापूर,तर अनुसूचित जमाती ज्यामध्ये पुरुष प्रवर्ग कोळेगाव आणि महिलांसाठी आरक्षित अनुसूचित जमाती निमखेडा बु.अशा पद्धतीने ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

## जालना जिल्ह्याचा वार्षिक कर्ज योजना आरंभ; प्राथमिकता क्षेत्रात ९१ टक्के कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वर्ष २०२५ या आर्थिक वर्षासाठी ७ हजार ७७० कोटीं रुपयांच्या वार्षिक कर्ज योजनेचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या हस्ते दि.११ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत मार्च २०२५ अखेरच्या तिमाहीसाठी जिल्हा सल्लागार समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीत बँकांच्या २०२४-२५ मधील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. विशेषतः पीक कर्जवाटपासह मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (उचएऋझ), प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, पंतप्रधान रोजगार योजना (झचएऋझ), पीएम-फॉर्मलायझेशन ऑफ मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्राइजेस (झचऋचए), शेती पायाभूत सुविधा निधी (-खऋ), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (चङठङच्) व स्वयं सहाय्यता गट (डकऋ) यासारख्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

अग्रणी जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार यांनी बैठकीचे संयोजन करताना २०२४-२५ मधील प्राथमिकता क्षेत्रातील एकूण ४ हजार २७० कोटीच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ३ हजार ८८४ कोटींची ९१ टक्के कामगिरी झाल्याची माहिती दिली. पीक कर्जातील बुडीत कर्जांचे प्रमाण वाढणे आणि नुतनीकरणाची कमी दर ही मुख्य कारणे अपूर्ण कामगिरीसाठी कारणीभूत असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील बँकिंग सेवा तुलनेने कमी असून एका बँक शाखेमागे सरासरी ९ हजार ६०० लोकसंख्या येते, जे की महाराष्ट्र राज्याच्या ६ हजार ३२६ लोकसंख्येच्या सरासरीपेक्षा कमी बँकिंग सुविधा दर्शवते. याबाबत अपर जिल्हाधिकारी व रिझर्व बँकेचे लीड डिस्ट्रिक्ट ऑफिसर अक्षय गोंदेंवार यांनी जिल्ह्यात अधिक शाखा सुरू करण्याचे आवाहन बँकांना केले. महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रादेशिक व्यवस्थापक एम. जे. पाटील यांनी जिल्ह्यातील शेती कर्जातील बुडीत कर्जाच्या वाढत्या प्रमाणामुळे नफा घटल्याचे स्पष्ट केले. बैठकीदरम्यान विविध योजनांमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकांचा अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. महाराष्ट्र ग्रामीण बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया यांना पीक कर्ज, पीएमएफएमई व सीएमईजीपी अंतर्गत चांगल्या कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. बँक ऑफ महाराष्ट्र ला पीएम विश्वकर्मा योजनेतील सर्वोच्च वाटपासाठी, पंजाब नॅशनल बँकेला सीएमईजीपीमधील चांगल्या कामगिरीसाठी, एचडीएफसी बँकेला महिला स्वयं सहाय्यता गटांमधील (चङठङच्) उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

आर-सेटी संचालक गिरीश सुलताणे यांनी बँकांना आवाहन केले की त्यांनी आरसेटीमधून प्रशिक्षित उमेदवारांना मुद्रा, उचएऋझ, झचएऋझ, पीएमएफएमई व अन्य योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत करून उद्दिष्ट पूर्ण करावे. अपर जिल्हाधिकारी मैत्रेवार यांनी बँकांना व शासनाच्या विविध यंत्रणांना आवाहन केले की, तालुका स्तरावरील यंत्रणांचा उपयोग करून शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व अडचणी सोडवाव्यात. भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावात दि. १ जुलै पासून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांदरम्यान प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना (झचगगइध), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (झचड्ढइध), अटल पेन्शन योजना(-झध) आणि प्रधानमंत्री जनधन योजना (झचगऊध) अंतर्गत नागरिक व शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करावी, असेही सांगितले. या बैठकीस ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. पठारे, महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रादेशिक व्यवस्थापक एम. जे. पाटील, विविध बँकांचे प्रतिनिधी व संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भास्कर दानवे यांच्या उपस्थितीत युवकांचा भाजपात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या जालना कार्यालयात आज सिरसवाडी येथील अनेक युवकांनी पक्षात प्रवेश केला. माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे यांच्या प्रभावी मार्गदर्शनावर विश्वास ठेवून व वंदना ताई ढगे यांच्या सहकार्याने दीपक ढगे, योगेश चांडोल, गणेश झुंबड, ओंकार खंडे, विलास गव्हाड, सार्थक ढगे, प्रेमानंद ढगे, गणेश खंडेकर, विलास ढगे, दिनेश ढगे या युवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रवेश प्रसंगी जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी सर्व नवप्रवेशितांचे मनःपूर्वक स्वागत केले. तसेच, पक्षाच्या विचारसरणीला बळकटी देण्यासाठी युवकांनी सक्रीयपणे सहभागी व्हावे व समाज परिवर्तनासाठी भाजपाच्या माध्यमातून कार्य करावे, असे आवाहन केले. यावेळी वंदना ढगे, सिद्धिविनायक मुळे, वसंत शिंदे, मुकेश चव्हाण, ओम कळकुंबे यांच्यासह आदी उपस्थित होते.

## अनाधिकृत वाहन लावणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करा -मुख्याध्यापक शेषराव वायाळ

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद विद्यालय मंठा येथे सकाळी ७:३० ते १२:१० पर्यंत वर्ग १ते ७ वी पर्यंत सुमारे ११०० विद्यार्थी आहेत, तसेच दुपारी वर्ग ८ ते १० वी पर्यंत १५०० विद्यार्थी असून शाळेच्या येण्याच्या मार्गात अवैध वाहतूक तसेच मोटरसायकलवर फिरणारे रोड रोमिओ यांचा त्रास वाढला आहे यांचा बंदोबस्त पोलिसांनी करावा असे शाळेचे शिक्षक शिंदे पी. आर. यांना विचारले असता यांनी सांगितले, मुख्याध्यापक शेषराव वायाळ यांना याविषयी विचारपूस केली तेव्हा त्यांनी सांगितले शुक्रवारी आठवडा बाजार असल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे रस्ता अरुंद असल्यामुळे अपघाताचे




प्रमाण वाढले आहे शाळेच्या येण्या-जाण्याच्या मार्गात अवैध वाहने लावल्याने वाहतूक कोंडी होऊन विद्यार्थ्यांना येण्या जाण्यासाठी त्रास होत आहे, अवैध वाहन लावणाऱ्या वर दंडात्मक कारवाई करावी तसेच अपघातावर आळा घालण्यासाठी डिवाडर व गतिरोधक लावण्यात यावे याकडे पोलीस प्रशासन व नगरपंचायत यांनी तातडीने लक्ष घालून प्रश्न मार्गी लावावा अशी अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली आहे..

फौजदार विठ्ठल केंद्रे यांना याविषयी विचारले असता त्यांनी सांगितले वाहतूक कोंडी होणार नाही याचा आम्ही बंदोबस्त करू परंतु जे पालक आपल्या विद्यार्थ्यांना घेण्यात करता येतात त्यांच्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था शाळेच्या वतीने करण्यात यावी.

## परतुर पंचायत समिती बनली भ्रष्टाचाराचा अड्डा -प्रकाश सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेअंतर्गत परतूर पंचायत समितीमधील गंभीर भ्रष्टाचार समोर आला असून, विभागीय आयुक्तांचा आदेश धुडकवून रोहियोच्या धडक विहिरी ला मान्यता दिली मास्टर ही काढले म्हणून गटविकास अधिकारी, कनिष्ठ अभियंते आणि रोजगार सेवक यांच्यावर तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आली आहे. २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधीत विहिरी, रस्ते, खडीकरण, पांदण अशा विविध मंजूर कामांमध्ये प्रत्यक्ष मजुरांकडून काम न करून घेता यांत्रिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्या सोबतच बोगस मस्टरद्वारे खोट्या नावाने मजुरांची उपस्थिती दर्शवून शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या कामांमध्ये लाभार्थ्यांकडून थेट २० टक्के लाच मागितल्याची तक्रार असून, ती रक्कम एजंट व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांमार्फत वसूल केली गेली आहे. एवढ्यावरच न थांबता, काही लाभार्थ्यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे ब्लॅकमेल करण्याचे प्रकारही सुरु आहेत. हे सर्व प्रकार कनिष्ठ अभियंते, रोजगार सेवक, गटविकास अधिकारी व इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचा ठोस आरोप आहे. विशेष म्हणजे, सद्यस्थितीत गटविकास अधिकारी परतूर यांनी स्वतःच जिल्हा परिषद जालना येथे आपला पदभार कमी करण्यासाठी लेखी अर्ज दिला असून, त्यांच्यावर याआधी २०१७-१८ मध्येही दोन हजाराहून अधिक विहिरींना मंजुरी देताना गंभीर अनियमितता झाल्याचे समोर आले होते. त्यावेळी त्यांच्यावर विभागीय आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांनी निलंबनाची कारवाई केली होती. आजही त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी प्रलंबित आहेत. याच पार्श्वभूमीवर सर्व संबंधित कागदपत्रांची, मंजुरी आदेशांची व खर्चाच्या तपशीलांची सखोल चौकशी व्हावी, कामांची प्रत्यक्ष पाहणी व्हावी, मजुरांची जबानी घ्यावी, कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासावे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जरी कनिष्ठ अभियंते व रोजगार सेवक हे कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असले तरी त्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असून, त्यांच्या सेवेची तत्काळ समाप्ती करून निलंबनाची शिस्तभंगात्मक कार्यवाही करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे गटविकास अधिकारी परतूर यांचा पदभार तात्काळ कमी करण्यात यावा, त्यांच्या विरोधातील तक्रारींची सखोल चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करून, परतूर पंचायत समितीत प्रामाणिक व पारदर्शक अधिकारी नेमावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत स्वतंत्र समिती गठीत करावी, ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्पष्ट मागणी आहे.

## जालना-नांदेड समृद्धी महामार्ग मध्ये भूसंपादन संबंधित मूल्यांकन प्रक्रिया असंविधानिक - आ.बबनराव लोणीकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना-नांदेड समृद्धी महामार्ग मध्ये असंविधानिक पद्धतीने मूल्यांकन प्रक्रिया राबविली जात असून संयुक्त मोजणी अहवालाची तपासणी न करता १९ ब च्या मावेजा वाटपाच्या नोटीस शेतकऱ्यांना देण्यात आल्या आहेत. भूसंपादन करताना संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून देखील जाणीवपूर्वक हकूमशाही प्रवृत्तीने शेतकऱ्यांना त्रास दिला जात असून अनेक वेळा शेतकऱ्यांनी लेखी स्वरुपात मागणी करून देखील त्यांच्या मागणीची कुठलीह दखल घेण्यात आली नाही परिणामी सोमवारपासून जमीन संपादित सर्व शेतकऱ्यांनी सामूहिक जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा संविधानिक पद्धतीने व योग्य मोबदला देण्यात यावा अशी मागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्रे केली आहे.

भूसंपादन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय अवार्ड तयार करून ताबा सोडणेबाबत नोटीस जमीन संपादित शेतकऱ्यांना पाठवल्या आहेत. त्यासाठी भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ११ जानेवारी २०२२ रोजी संयुक्त मोजणी करून परिशिष्ट १६ तयार केले आहे परंतु यामध्ये मोठ्या प्रमाणात चुका किंवा त्रुटी तसेच मोठी तफावत आढळून आली आहे या चुका दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी वारंवार पत्रव्यवहार केला आहे परंतु अद्याप पर्यंत या चुका दुरुस्त करण्यात आलेल्या नाहीत तसेच या सर्व चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेल्या संयुक्त मोजणीच्या नोंदी तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी कुठलीही तपासणी न करता १९ ब च्या मावेजा वाटपाच्या नोटीस दिनांक २५ जून २०२४ रोजी ग्राम महसूल अधिकारी अर्थात तलाठ्यांमार्फत शेतकऱ्यांना पाठवले आहेत या बाबीची देखील चौकशी करणे आवश्यक असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले परतुर तालुक्यातील यदलापूर येथील राष्ट्रीय महामार्ग लगत असणाऱ्या जमिनीला १० ते १२ लाख रुपये तर त्यापेक्षा अधिक अंतरावर असणाऱ्या जमिनीला मात्र ५५ ते ६० लाख रुपये मावेजा देण्यात येत आहे, तसेच २०२१ मध्ये सर्व रजिस्ट्री व फेरफार बंद झालेली असताना २०२३ मध्ये करण्यात आलेले रजिस्ट्री व फेरफार ग्राह्य धरून अधिकचा मावेजा दिला जात आहे. अशी तक्रार देखील शेतकऱ्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे शासन निर्णयातील अनुसूची १,२,३ मधील कलमानुसार मूल्यांकन करणे आवश्यक आहे. २०१३ भूसंपादन कायद्यानुसार निवाडे तयार करून बेकायदेशीर व विनासंमती निवाडे रद्द करून कलम १९ जे च्या प्रचलित कायद्यानुसार भूसंपादन करणे आवश्यक असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे. मुद्रांक विभागाच्या बाजार मूल्य चुकीचे असल्याने नवीन समिती नेमून सुधारित मूल्य दरानुसार मूल्यांकन करून मावेजा देण्यात यावा. चालू व वास्तविक चालू व खासगी बाजारभावाच्या पाचपटीने व वाटाघाटीने भूसंपादन करून गुणांक २ प्रमाणे पाचपट मावेजा देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे केली आहे. तसेच मूल्यांकन प्रक्रिया राबवताना पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत अशी मागणी देखील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. अधिसूचना निघून ४ वर्षे झाले असताना भूसंपादन प्रक्रिया अद्याप पर्यंत पार पडलेली नाही त्यामुळे नव्याने अधिसूचना काढून भूसंपादन प्रक्रिया पार पूर्ण करण्यात यावी अशी मागणी देखील लक्षवेधी सूचनेद्वारे आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.

# नांदेडच्या सीसीटीव्ही प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत निर्देश देणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१५ जुलै -**

नांदेड शहरात सीसीटीव्ही यंत्रणा व नियंत्रण कक्ष उभारण्यासाठी शासनाकडे सादर १०० कोटी रुपयांच्या कामाचा प्रलंबित प्रस्ताव तपासून त्याला मान्यता देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात येतील, असे आश्वासन गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आ. श्रीजया चव्हाण यांना दिले आहे.

## आ. श्रीजया चव्हाण यांच्या प्रश्नाला गृह राज्यमंत्र्यांचे उत्तर

मंगळवारी विधानसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासात आ. श्रीजया चव्हाण यांनी याबाबत उपप्रश्न विचारला होता. या प्रस्तावाला शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र, अद्याप निधी मिळाला नसल्याकडे आ. श्रीजया चव्हाण यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावून त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली. सीसीटीव्हीची देखभाल व दुरुस्ती संदर्भात त्यांनी विचारलेल्या अन्य उपप्रश्नावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री पुढे म्हणाले की, या कामासाठी संपूर्ण राज्यात



एकसूत्रता आणण्याकरिता गृह विभाग एसओपी तयार करीत असून, ते लवकरच वितरित होतील.

## संक्षिप्त वृत्त

### मुदखेड पोलीस स्टेशन येथील बेवारस वाहनाचा १७ जुलै रोजी लिलाव

**मुदखेड -** नांदेड जिल्ह्यातील सर्व लिलावधारकास एका जाहीर प्रगटनाद्वारे आव्हान करण्यात आले आहे की. पोलीस स्टेशन मुदखेड येथे बेवारस रित्या असलेल्या एकूण २२ मोटरसायकली वाहने जप्त करून पोलीस स्टेशन आवारात लावण्यात आलेल्या आहेत सदर जप्त बेवारस वाहन स्क्रॅप करून निर्गती करणे असल्याने त्यांची दि.१७ जुलै २०२५ रोजी लिलाव प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. ज्यांना ज्यांना लिलाव प्रक्रियेत भाग घ्यायचा आहे अशा सर्व लिलाव धारकांनी लिलावाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून अनामत रक्कमेसह जाहीर प्रगटन प्रसारित झाल्याच्या दिनांका पासून दोन दिवसांचाच्या आत पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन मुदखेड यांच्याशी संपर्क करावा असे आव्हान पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी केले आहे.

### शिवविजय कॉलनी तरोडा बु. येथे पायाभूत सुविधा द्या; रहिवाशांची मागणी

**नांदेड-** तरोडा बु. भागातील शिवविजय कॉलनी येथे पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था झाली असून जलनिस्सारण, पाणीपुरवठा व स्वच्छता लवकरात लवकर कराव्यात, या मागणीचे निवेदन महानगरपालिका आयुक्त यांना शिवविजय कॉलनी येथील नागरिकांनी दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, या भागात डांबरी रस्ते असूनही मुख्य रस्ता अधिक उंच असल्याने पावसाळ्यात नाली व गटाराचे पाणी तुंबुन रस्त्यावर येते, त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण होत आहे आणि रोगराई पसरत आहे. या भागात पिण्याचे पाणी उपलब्ध असले तरी पाईपलाईनची जाडी कमी असल्याने पाण्याला प्रेशर येत नाही. शिवाय पाणीपुरवठ्याचे कोणतेही निश्चित वेळापत्रक नाही, त्यामुळे नागरिकांना फार त्रास होत आहे. नियमित साफसफाई होत नाही त्यामुळे नाल्या तुंबून दुर्गंधी व अस्वच्छता पसरत आहे. त्यामुळे जलनिस्सारणासाठी सखल भागात नवीन व सुधारित नाल्यांचे काम तातडीने सुरू करावे, पाणी पुरवठा पाईपलाईन मोठ्या व्यासाची करावी व वेळापत्रक ठरवून नियमित पाणी सोडावे, कॉलनीत नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, अशा मागण्या निवेदनात केल्या आहेत. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी यांना देण्यात आली आहे. या निवेदनावर व्ही.बी. चौलवार, ॲड. शैलेश धोंडकर, धुंडीराज कहाळेकर, मधुकरराव चालीकवार, शंकर गादेवार, प्रा. आनंद मंगनाळे, शिवाजी मुस्तापुरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संभाजी ब्रिगेडचे नेते प्रविणद गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

**बिलोली-** राजमाता जिजाऊ ,शाहु फुले , आंबेडकर ,बहुजन विचार धारेचे तथा संभाजी ब्रिगेडचे नेते प्रविणदादा गायकवाड यांच्यावर काल दि.१३ जुलै रविवार रोजी आक्कलकोट जि.सोलापुर येथे दिपक काटे व त्यांचे साथीदारानी जिव घेणे केलेल्या भ्याड हल्ल्याचा तालुका बिलोली सकल मराठा समाज,संभाजी ब्रिगेड व बहुजन समाजाच्या वतिने जाहीर निषेध करण्यात आले आसुन सदरील हल्लेखोरावर तात्काळ कठोरात कठोर कार्यवाही करुन अटक करावी अन्यथा येत्या काळात तिव्र अंदोलन छेडण्याचा ईशारा एक निवेदनाद्वारे तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे देण्यात आले.सदर निवेदनाची प्रत पोलीस निरीक्षक बिलोली अतुल भोसले याना देण्यात आली या निवेदनावर राजु पा.शिंपाळकर,दिलीप पांढरे , पांडुरंग रामपुरे, शंकर व्यंकम,श्रीनिवास पा.शिंदे, चक्रधर पा.टेकाळे,हाणमंत पा. कदम,केदार पा.ढगे,सय्यद रियाज,आनंदराव जाधव,देवराव शिंदे,रवि पा.जाधव,आदीच्या सह्याचे निवेदन देण्यात आले.

### भारतीय बौद्ध महासभेच्या संघटकपदी सुभाष लोखंडे यांची नियुक्ती

**नांदेड -** भारतीय बौद्ध महासभा नांदेड उत्तरच्या संघटकपदी येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांची निवड करण्यात आली असून त्याबरोबरच श्रद्धास्थळ भीमघाटच्या व्यवस्थापकपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. तसे निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी महासभेचे जिल्हा कार्यालयीन सचिव सा.ना. भालेराव, शहर शाखा अध्यक्ष ईश्वर जोंधळे, , शहर शाखा उत्तरचे सरचिटणीस रमेश कोकरे, यशवंत ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील श्रद्धास्थळ भीमघाटस्थित नालंदा बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा उत्तर नांदेड शाखेची एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत नांदेड उत्तर संघटक तसेच व्यवस्थापक, श्रद्धास्थळ भीमघाट या महत्त्वपूर्ण पदांवर सुभाष लोखंडे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. या वेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. उपस्थित सर्वांनी लोखंडे यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा व आशीर्वाद दिले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभा शाखा उत्तर नांदेडच्या संघटकपदी आणि श्रद्धास्थळ भीमघाटच्या व्यवस्थापकपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रकाश येवले, डॉ. प्रा. गौतम धुथडे, ग्यानोबा दुधमल, डी. एम. निखाते, अनुरत्न वाघमारे, सुभाष काटकांबळे, प्रज्ञाधर ढवळे, एल. के. कोकरे गुरुजी, रंजीत गोणारकर, दामोदर सरकटे, राहुल कोकरे, तुपेकर, भैयासाहेब गोडबोले, सुनील खिल्लारे, संदेश थोरात, श्रीधर कांबळे, शाहबुद्ध पाईकराव, प्रभाकर नरवाडे, विजय गोडबोले, रंगनाथ कांबळे, गोवर्धन हिगोले, भगवान कोकरे, राजू लोखंडे, मारुती हाटकर, राहुल गायकवाड, राहुल बहादुरे, भिमराव कदम, किरण जोंधळे, प्रशांत गवळे, आनंद गोडबोले, अनिकेत कांबळे, बळीराम निखाते, मनोज वाघमारे, सोनू नवरे, राजू कांबळे, मिलिंद कोकरे इत्यादींनी अभिनंदन केले.

# सौंदर्यविषयक स्त्रीरोगशास्त्राची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१५ जुलै -**

मराठवाड्यात प्रथमच दि. १३ जुलै रोजी हॉटेल चंद्रलोक येथे नांदेड स्त्रीरोग संघटना, नांदेड सर्जीकल संघटना व फेमेरा लेझर आणि कॉसमेटीक स्त्रीरोग क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने सौंदर्यविषय स्त्रीरोगशास्त्राची कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी दुबई येथील कार्यरत असलेल्या डॉ. गरिमा श्रीवास्तव, पटना येथून आलेल्या डॉ. मिनी आनंद आणि मैसूर येथून आलेल्या सिंधू लक्ष्मी तसेच इंदौर येथून आलेले डॉ. प्रवीण अग्रवाल व नांदेड येथील डॉ. सई शिरडकर यांनी उपस्थित डॉक्टरांना लेझर तंत्रज्ञानाची स्त्रीसौंदर्यशास्त्रातील आधुनिक लेझर तंत्रज्ञानाची उपचार पद्धतीबद्दल माहिती दिली. तसेच दुसऱ्या भागात अभुदय लाईफ केअर सेंटर येथून थेट प्रक्षेपणाद्वारे या शस्त्रक्रिया दाखविण्यात आल्या. यामध्ये डॉ. प्रवीण अग्रवाल, डॉ. पी.टी. जमदाडे, डॉ. संतोष शिरडकर, डॉ. सई शिरडकर, डॉ. तगडपल्ले, डॉ. इरफान व डॉ. दारकू यांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी नांदेड स्त्रीरोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मेघश्री देशमुख कहाळेकर, सचिव डॉ. प्रांजली जोशी, कोषाध्यक्षा डॉ. शुभांगी पवार, डॉ. गायत्री वाडेकर, डॉ. सारिका झुंजारे, डॉ. विभा भालेराव, डॉ. अरूण महाले, डॉ. श्रीधर आलूरकर, डॉ. संजय कदम, डॉ. शोभा तोष्णीवाल, डॉ. खमर सुलताना, डॉ. संतोष कट्टे, डॉ. स्मीता कदम, डॉ. स्मीता मोरे, डॉ. अपर्णा देशमुख, डॉ. सुप्रिया पंडित, डॉ. वर्षा कदम, डॉ. कल्पना पाटील, डॉ. राजेंद्र धांडे, डॉ. संगीता मसारे, डॉ. संतोष दुरूगकर, डॉ. गणेश देगलूरकर, डॉ. प्रियंका पावडे, डॉ. डॉली सोनाळे, डॉ. निता रायेवार, डॉ. अनघा घई, डॉ. शीतल लव्हेकर, डॉ. अनघा लव्हेकर, डॉ. विडेकर, डॉ. विना राचेवाड, डॉ. छाया गिते, डॉ. स्मीता डोंगरगावकर, डॉ. वर्षा पवार, डॉ. नय्यर कादरी, डॉ. सुभांगी देशमुख, डॉ. मनिषा ऐटवार, डॉ. हर्षद देशपांडे, तसेच पुणे, अहमदपूर, उदगीर, सातारा, मथुरा, बेंगलोर येथील स्त्रीरोगतज्ज्ञ आले होते व नांदेड स्त्रीरोग संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शीतल कुरूंदकर, डॉ. मंजुषा मुरमुरे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नांदेड येथील पहिला फेमेरा कॉसमॅटीक गायनॅकोलॉजी क्लिनिकच्या लेझर आणि हायफेम चेअरचे उदघाटन करण्यात आले. आभार डॉ. सई शिरडकर यांनी मानले.

# केरोळी फाटा गुंडवळ-तांदळा-इवळेश्वर रस्त्याची दुरवस्था;तातडीने दुरुस्ती करा,अन्यथा जनांदोलन

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.१५ जुलै -**

माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना स्वातंत्र्याचे तब्बल ७८ वर्षे पूर्ण होत आले असतानाही रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असून त्यांचे जीवाचे हाल थांबायला तयार नाही. तालुक्यातील बहुतांश रस्त्यांचे तीन तेरा वाजल्याने अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांचे भाग्य उजाळणार कधी? हा त्या भागातील जनतेचा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे केरोळी फाटा ते गुंडवळ -तांदळा मार्गे इवळेश्वर या डोंगराळ ग्रामीण भागातील रस्त्याची झालेली दूरवस्था बघितल्यावर येत असून पावसाच्या पाण्यामुळे दलदलीचे स्वरूप येऊन सदरील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून तूर्तास रहदारी योग्य रस्ता तयार करुन द्यावा , अन्यथा! सामुहिक जन आंदोलन करणार! असा खणखणीत इशारा तब्बल ०९ गावच्या सरपंचांनी एकाचवेळी एका संयुक्त निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम उप विभाग,माहूर दि.१४ जुलै रोजी दिल्याने संबंधित प्रशासनासह खळबळ उडाली आहे.याची प्रतिलिपी आ. भीमराव केराम यांनीही दिली आहे.

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम आणि एकेकाळच्या नक्षलग्रस्त ग्रामीण भागातील गावच्या नागरिकांना दळणवळणाची एकमेव सुविधा असलेला केरोळी फाटा ते गुंडवळ - तांदळा मार्ग इवळेश्वर असा जाणारा रस्ता जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्याकडे वर्ग करुन घेतला.मात्र ,सदरील रस्त्याचे पावसाळ्याचे दिड महिने लोटूनही अद्याप दूपदरीकरणासह मजबुतीकरण करण्यात आले नसल्याने रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या रस्त्यावर पायी चालणे देखील महाकठीण झालेले आहे.या मार्गावरील रस्त्यावरील पूले तुटली असून, रस्ता चिखलमय झाला आहे.




## नऊगावच्या सरपंचांचा सा.बां. उप विभाग, माहूरला निवेदनाद्वारे इशारा!

सदर रस्त्याचे डांबरीकरचे काम मंजूर असून सध्या पावसाळ्यामुळे थांबले आहे.

परिणामी या भागातील रस्ते अनेक ठिकाणी पावसाळ्यामुळे किंवा इतर कारणांमुळे चिखलयुक्त (दलदलीचे) झाले आहेत. यामुळे लोकांना ये-जा करण्यासाठी अडचणी येत आहेत.रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे किंवा खडी उखडल्यामुळे ते चिखलयुक्त झाल्याने लोकांना पायी चालणे, सायकल चालवणे,किंवा वाहन चालवणे कठीण कठीण झाले आहे. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी अडचणी येत असल्याने शेतीची कामे वेळेवर होत नाहीत. तसेच या भागात आपात्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा इतर आवश्यक सेवा वेळेवर पोहोचू शकत नाहीत.वस्तूंची वाहतूक कमी झाल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असून या समस्येचे निराकरण करण्यासाठी रस्त्यांची नियमित दुरुस्ती आणि डांबरीकरण करावे अन्यथा लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्याचा इशारा,नागरिकांसह तब्बल ०९ गावातील सरपंचांनी एकाचवेळी एका संयुक्त निवेदनाद्वारे आपल्या स्वाक्षरीने दिला आहे.

या निवेदनावर सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष (लखमापूर )गणेश राठोड, सौ. दुर्गा संतोष जाधव (तांदळा), रामेश्वर किसन जाधव (गुंडवळ),प्रविका इंदल राठोड (पवनाळा), वंदना दुधराम राठोड (ईवळेश्वर ),सुभाषकिसन आडे (महादापूर),

गजानन रमेश राठोड (बोरवाडी), प्रफुल बंडू भुसारे (कुपटी),सौ.सुलोचना अर्जुन पवार( दत्तमांजरी) या सरपंचांसह संतोष जाधव, विठ्ठल प्रेमसिंग राठोड, गजानन किसन कऱ्हाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१५ जुलै -**

नांदेड जिल्ह्यात १६ जुलैचे सकाळी ६ वाजेपासून ते ३० जुलै २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १६ जुलैचे सकाळी ६ वाजेपासून ते ३० जुलै २०२५ मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारींना देण्यात आले आहेत.

# हाणेगाव येथील राष्ट्रीय महामार्ग रस्ता बनला मृत्युचा सापळा

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव, दि.१५ जुलै -**

देगलुर तालुक्यातील हाणेगाव येथुन जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ हे वझर ते कुंदराळा नांदेड मार्गाला जोडणारा रस्ता बनला मृत्युचा सापळा हा रस्ता झाल्यापासुन रस्त्यावर अपघात होण्याचे प्रमान वाढले असून जवळपास ३० ते ३५ लोकांचा आतापर्यंत मृत्यू झाल्याची नोंद आहे म्हणुन याकडे संबंधीत विभागाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे .

हाणेगाव हा तिन राज्याच्या सिमेवरती वसलेले गाव असल्यामुळें या रस्त्यावर रहदारी मोठी असते प्रवाशी वर्गाला व एस टी ला९ थांबायला जागा नसल्यामुळे थेट रोडावरच वाहने थांबवुन प्रवाशी वाहनात बसवले जातात यावेळी समोरुन किंवा पाठीमागुन वाहन कधी येईल आणि कोनाला धडक देईल याचा नेम राहीला नाही म्हणुन सध्या परीस्थितीला बसस्टॉप होण्याची गरज आहे . उदगीर देगलुर औराद बसेसला रात्री



थांबण्यासाठी जागाच नसल्यामुळे वाहन रोडावर लावल्यामुळे अपघात होत आहेत परीसर मोठा असल्यामुळे प्रवाशांची व वाहणांची ये-जा जास्तच असते लोकांना स्थानिक पातळीवर बसस्टॉप नसल्यामुळे कोन्ही थांबल्या वाहनाला धडक मारतो तर कोनी चालत्या बसलाच धडक मारल्यामुळे अपघातात वाढ होत आहे म्हणुन याची दखल संबंधीत विभागाने घेण्याची गरज आहे, जर गावालगत रस्त्याचं योग्य नीयोजन व तिन्ही चौकात गतीरोधक बसवले तर अपघात होण्यापासून बचाव होईल अशी चर्चा स्थानीक नागरीकातुन होत आहे.

# रेल्वे गेट जवळ पादचारी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि.१५ जुलै -**

शहरातील नागरिकांनी रेल्वे गेट जवळ पादचारी रस्ता उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली आहे. या मागणीसंदर्भात नगरपरिषद कार्यालयात लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. मुदखेड मधील भुयारी मार्गाचे काम चालू असून नागरिकांना पाई जाण्याची अडचण होत आहे तरी नगरपरिषदेने याकडे लक्ष द्यावे आणि नागरिकांना पादचारी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी नागरिकांनी केलेली आहे

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, रेल्वे गेट जवळ दोन्ही बाजूंनी रेल्वे विभागामार्फत संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. यामुळे नागरिक, विद्यार्थी आणि महिलांना बाजारपेठ व इतर भागांमध्ये ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषत कोरोनानंतर शहराच्या दोन्ही भागातील नागरी वसाहती वाढल्यामुळे नागरिकांचा बाजारात वर्दळ वाढली असून पादचारी मार्ग बंद असल्यामुळे वाहनांमध्ये



जावे लागते, ज्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होत आहे.

म्हणून या पार्श्वभूमीवर नागरिकांनी तात्काळ पादचारी रस्ता खुला करण्याची मागणी केली आहे. अन्यथा शहरातील नागरिकांकडून आंदोलन छेडले जाईल, असा इशारा निवेदनात नमुद केले आहे. नगरपरिषद कार्यालयाने याची दखल घेत लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी निवेदनकर्ते गिरिष कोत्तावार, पत्रकार ईश्वर पिन्नलवार,प्रकाश बल्फेवाड, विलास मेड, सचिन चंद्रे, शैलेश बोडके, अभिजीत नातेवाड, विजय होळकर, पत्रकार अब्दुल रज्जाक, यासह आदिंची उपस्थीती होती.

# स्वरातिम विद्यापीठात महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि.१५ जुलै -**

स्वारातीम विद्यापीठ नांदेड येथे २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ या क्रीडा महोत्सव दिनांक २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत हा महोत्सव पार पडणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचे आयोजिले आहे. संबंधित क्रीडासाठी लागणाऱ्या क्रिडांगणाची दुरुस्तीची तयारी जोरात चालू आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे २०२५ यावर्षीचा क्रीडा महोत्सवात एकूण ८ प्रकारचे खेळ खेळणार आहे ते सदरील आठ क्रीडा प्रकारात अथलॅटिक क्रीडा प्रकारात (धावणे, भालाफेक, गोळा फेक, उंच उडी) यासह बास्केटबॉल, हॉलीबॉल, टेबल टेनिस, बुद्धिबळ, खो- खो, कबड्डी, बॅटमिंटन या आठ प्रकारच्या खेळामध्ये



जवळपास ४ हजार मुले-मुली प्रशिक्षक व व्यवस्थापक उपस्थित राहणार आहेत. यामध्ये मुलांच्या निवासस्थानाची व्यवस्था यात्री निवास कौठा व मुलींच्या निवासस्थानाची व्यवस्था विद्यापीठ परिसरातील मुलींचे चार वस्तीगृह येथे असेल तर पंच आयोजन समितीचे सदस्य व इतरांसाठी विद्यापीठातील अतिथीगृह, मुलांचे वस्तीग्रह व क्रीडा वस्तीगृह येथे करण्याचे आयोजिले आहे. वरील सर्वांसाठी भोजन व्यवस्था ५ हजार लोकांसाठी क्रिकेट मैदानावर करण्यात येणार आहे. सर्व क्रीडा प्रकारातील खेळाडूंना खेळण्यासाठी लागणारे मैदानी अद्यावत करण्याचे काम युद्धपातळीवर चालू आहे. सदरील क्रीडा महोत्सव २०२५ यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्र-वित्त व लेखाधिकारी, क्रीडा संकुलाचे संचालक डॉ. भास्कर माने व स्थावर विभाग यांच्यासह क्रीडा संकुलाचे सर्व कर्मचारी हे परिश्रम घेत आहेत.

# नूतन पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची मुंबईत घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१५ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात मुंबईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची देवगिरी निवासस्थानी भेट घेऊन आभार मानले आहेत.

राष्ट्रवादीचे नेते तथा लोहा



कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या वसंत नगर येथील निवासस्थानी दिनांक १३ जुलै रोजी जिल्ह्यातील नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या निवडीनंतर आज प्रथमच नवनियुक्त पदाधिकारी यांनी मुंबई येथे जाऊन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली.

या शिष्टमंडळामध्ये राज्यमंत्री इंद्रनील नाईक. माजी आ.मोहनराव हंबर्डे, माजी आ.अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष माधव पावडे, शेषेराव चव्हाण आदींची उपस्थिती होती.

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सर्वाधिक यश मिळवून देण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने तळमळीने कामाला लागावे. एकमेकांच्या मनात कोणत्याही शंका कुशंका न ठेवता पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करावे निश्चितपणे आगामी काळातही अनेकांना अनेक पदांवर संधी दिली जाईल असा विश्वासही अजितदादांनी यावेळी दिला. अजितदादांच्या या ग्वाहीनंतर आणि भेटीनंतर पदाधिकाऱ्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.